
अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि.२ ऑक्टोबर २०२२ | वर्ष : २१ वे अंक : ५ वा किंमत : ५ रुपये पाने ८



राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन..!

आजचा रंग नारंगी

# पुणे पोलिसांनी पकडले लोन ॲपचे टोळके, त्यात निघाले सोलापूरचे चार म्होरके

## बनावट कॉलसेंटरचा फंडा, अनेकांना घातला गंडा

सुराज्य/सोलापूर

**लोन ॲपच्या माध्यमातून देशभरात नागरिकांना गंडा घालणाऱ्या टोळक्याला पुणे पोलिसांनी नुकत्याच बेड्या ठोकल्या असून या टोळीचे म्होरके मात्र सोलापुरातील असल्याचे उघडकीस आले आहे. एकूण १८ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी ४ आरोपी हे सोलापूरचे आहेत. या टोळक्याने फसवणुकीसाठी हात घातलेली विविध बँकांमधली तब्बल १ लाखांहून अधिक खाती पुणे पोलिसांनी गोठवल्यामुळे हजारो कोटींची फसवणूक टळली आहे.**

इन्स्टंट लोन उपलब्ध करून देण्याची जाहिरात विविध सोशल साईटस्‌वर प्रसिध्द केली जात होती. त्या जाहिरातीमध्ये दिलेल्या लिंकद्वारे ५०० रुपयांपासून ७ हजार रूपयांपर्यंत स्पॉट लोन सँक्शन करून दिले जात होते. त्यासाठी कर्जदाराने लोन ॲपची लिंक डाऊनलोड केल्यानंतर कर्जदाराच्या मोबाईलमधील सर्व डाटा कॉपी करून हे टोळके स्वत:कडे ठेवत होते. कर्ज घेतल्यानंतर आठवड्याने ३० पासून ३०० टक्क्यांपर्यंत व्याज आकारणी करून पैसे भरण्यासाठी हे टोळके कर्जदारांना त्रास देत असे. कर्जफेडीसाठी हे टोळके कॉलसेंटरमधून अश्लील भाषेत शिवीगाळसुध्दा करत होते. यासंदर्भातील हजारो तक्रारी पुणे पोलिसांकडे आल्या होत्या. त्यांचा तपास करताना पुणे शहर पोलिसांच्या सायबर शाखेला बेंगलोरमधील कॉलसेंटर सापडले. यामध्ये एकूण १८ लोकांना अटक आली असून देशातील १ लाख लोकांची होणारी फसवणूक टळली आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी दिली आहे.

### असा चालायचा गंडा घालण्याचा धंदा

१. इन्स्टंट लोन देणारी काही ॲप्लिकेशन्स गुगल प्ले स्टोअर व अन्य वेबसाईटवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध करून दिली जातात.
२. लोन ॲप्लिकेशन युजरच्या मोबाईलवर डाऊनलोड केल्यानंतर युजरचा कॅमेरा, कॉन्टॅक्ट, एसएमएस, लोकेशन, स्टोरज, मायक्रोफोन, गॅलरी इ.च्या परमिशन्स अलाऊ करण्याचा मेसेज पाठवला जातो. सर्व डेटा लोन अप्लिकेशन कंपनीला जातो.त्याठिकाणी हा डेटा क्लोन केला जातो.
३. कर्जाची रक्कम युजरच्या ॲकाऊंटवर जमा झाल्यानंतर आठवड्यातच ३० ते ३०० टक्के व्याज आकारले जात होते. त्याची परतफेड न केल्यास अथवा केल्यानंतरही पुन्हा पुन्हा पैसे भरण्याचा तगादा लावला जातो.
४. कर्ज घेतल्याच्या महिन्यानंतर कर्जदाराचा डेटा मॉर्फिंग करून त्याच्याच कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये व्हायरल करण्याची धमकी देऊन खंडणी उकळली जात होती.

### अटकेतील आरोपी

स्वप्निल हनुमंत नागटिळक, श्रीकृष्ण भीमण्णा गायकवाड, धीरज भारत पुणेकर, प्रमोद जेम्स रणसिंग (सर्व रा. सोलापूर), मुमताज कुमठे सॅम्युअल कंदीयल पिता इब्राहिम, मोहम्मद मनियत पिता मोहिदू (रा. केरळ), विघ्नेश मंजुनाथ, गणेश सुब्बारायडू (रा. बेंगलोर), आकाश एम.व्ही (रा. कर्नाटक), श्रध्दा सुधाकर गौडा (कर्नाटक), पार्वती संतोष दास(आसाम), अश्विनी डी मुर्गन (कर्नाटक), सय्यद अकिब पाशा(कर्नाटक), मुबारक अफरोज बेग(बेंगलोर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.



स्वप्निल नागटिळक | श्रीकृष्ण गायकवाड | धीरज पुणेकर | प्रमोद रणसिंग

### सोलापुरी आरोपींवर आहेत गुन्हे दाखल

**स्वप्निल नागटिळक याच्यावर बनावट कागदपत्रांद्वारे कर्ज मिळवून दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर तो फरार झाला होता. श्रीकृष्ण गायकवाड हा एका पतसंस्थेत नोकरीस होता. त्याठिकाणी अपहार केल्यानंतर त्याला नोकरीवरून कमी करण्यात आले होते. धीरज पुणेकर याच्यावर लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल असून तो सध्या जामिनावर आहे. प्रमोद रणसिंग हा खासगी फायनान्समध्ये रिकव्हरी एजंट म्हणून काम करत होता.**

### ७० लाखांचा मुद्देमाल जप्त

महाराष्ट्रातून अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून ४८मोबाइल हँडसेट व सिमकार्ड एकूण, बँक खाते ५६,संगणक व लॅपटॉप चेकबूक पासबुक २७, इतर कंपनीचे सिम ३०, डेबिट कार्ड १६७, पेटीएम मशीन १, पॅनकार्ड १५, आधारकार्ड ११, मतदार कार्ड ४, शिक्के ४ असा मुद्देमाल जप्त केला आहे. बेंगलोरमधून अटक केलेल्या आरोपींकडून १० सिमकार्ड, हजेरी रजिस्टर,ओळखपत्र, लेटरहेड,नोंदवही, डीव्हीडी, १५ लॅपटॉप, इंटरनेट कनेक्टर,स्विच मशीन, ३ इंटरनेट राऊटर, पीडितांचे मोबाईल क्रमांकाचे चार्ट,५० इन्व्हाईस फाईल्स, १० मोबाईल फोन, हेडफोन असा ७० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## सोलापूर जि.प.अध्यक्षपद ओबीसीसाठी आरक्षित

**सोलापूर** : राज्यातील ३४ जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण नुकतेच जाहीर झाले असून सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पद हे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (ओबासी) आरक्षित जाहीर झाले आहे. अध्यक्ष पदाचे आरक्षण ३० सप्टेंबर रोजी ग्रामविकास विभागाने प्रसिध्द केले. अध्यक्ष पदाचे आरक्षण पडले मात्र निवडणुका संदर्भात अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.



जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून आतापर्यंत अध्यक्ष म्हणून २० जणांनी अध्यक्षपदाची सूत्रे सांभाळली आहेत. एकविसावे अध्यक्ष म्हणून ओबीसीमधून म्हणून कोण बाजी मारणार याकडे जिल्ह्याच्या नजरा लागल्या आहेत.

या अगोदर जिल्हा परिषदेत सर्वसाधारण मागास प्रवर्गातून एक महिला आणि एक पुरुषाला अध्यक्षपदाची संधी मिळाली होती. त्यानंतर पुन्हा आता तीच संधी चालून आली आहे. यापूर्वी सर्वसाधारण मागास प्रवर्गातून महिला म्हणून माढ्यातून निशिगंधा माळी तर त्या अगोदर अकलूजमधून नारायणराव खंडागळे यांची वर्णी लागली होती. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदासाठी सर्वसाधारण मागास प्रवर्गातून महिला किंवा पुरुष आरक्षण असल्याने या दोघांमध्ये रस्सीखेच होण्याची दाट शक्यता आहे. तसेच कुणबी मराठा उमेदवार असेल तर अशा उमेदवाराला यावेळी आपले नशीब आजमावता येणार आहे. जिल्हा परिषदेचे २१ नूतन अध्यक्ष म्हणून नेमके कोण बाजी मारणार याकडे सर्वांच्या नजरा लागून राहिल्या आहेत.

## लंपी आजाराने आत्तापर्यंत १७ जनावरांचा मृत्यू

### शुक्रवारी चार गाईंचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात लंपी आजाराने शुक्रवारी चार गाईंचा मृत्यू झाल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाने दिली. सांगोला तालुक्यातील वाढेगाव, मिसाळवाडी आणि धायटी येथील प्रत्येकी एक तर तालुक्यातील कचरेवाडी येतील एका गाईचा मृत्यू झाला.

जिल्ह्यात लंपी आजाराने आतापर्यंत १७ जनावरांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये १० गाई



आणि सात बैलांचा समावेश आहे. आतापर्यंत मृत झालेले १७ जनावरे माळशिरस तालुक्यातील तिरवंडी येथील एक, शिंदे वाडीतील दोन बैल आणि कचरेवाडीतील एका गायचा समावेश आहे. सांगोला तालुक्यातील शिवणे, महुद, धायटी, मिसाळवाडी, वाढेगाव प्रत्येकी एका गायचा समावेश आहे. पंढरपूर येथील कान्हापुरी येथील एका गाय, माढा मधील चौबे पिंपरी तील एक बैल, करमाळा तालुक्यातील सावडी व राजुरी या गावातील प्रत्येकी एक गाय, उत्तर सोलापूर तालुक्यातील कवठे, बेलाटी, देगांव गावातील प्रत्येकी एक बैल आणि बसवेश्वरनगर तील एक गायचा समावेश आहे.

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते ५ जी सेवेचा शुभारंभ

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी नवी दिल्लीतील प्रगती मैदानावर आयोजित इंडिया मोबाइल काँग्रेसच्या सहाव्या सत्राचे उद्घाटन पार पडले.




यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील ५ जी सेवेचाही शुभारंभ केला. ही सेवा भारतात कशा प्रकारे क्रांती घडवून आणेल, यावर भाष्य केले. तसेच आजच्या तारखेची नोंद इतिहासात सुवर्ण अक्षरांत होईल, असेही ते म्हणाले. आम्ही सत्तेत आल्यानंतर देशात तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला. आम्ही डिजिटल भारत ही संकल्पना सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.

## तामलवाडीजवळ एसटीच्या धडकेने दुचाकीवरील तरुण ठार

**सोलापूर** : मार्डी (ता.उत्तर सोलापूर) येथे देवदर्शन आटोपून दुचाकीवरून ट्रिपल सीट तुळजापूर असताना एसटीच्या धडकेने किशोरवयीन तरुण ठार तर त्याची आई आणि बहीण असे दोघी जखमी झाले. हा अपघात शनिवारी दुपारच्या सुमारास घडला.

योगेश संतोष बेल्लारे (वय १७ रा.सारोळा जि.लातूर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर त्याची आई सुवर्णा बेल्लारे (वय ३५) आणि बहीण वैष्णवी संतोष बेल्लारे (वय १४ रा.सारोळा) या दोघी जखमी झाल्या. त्यांना उपचारासाठी शासकीय सोलापुरातील दाखल करण्यात आले. योगेश बेल्लारे यांच्यासह तिघेजण आज दुपारी मार्डी येथे दर्शनासाठी गेले होते. त्यानंतर तिघेजण दुचाकी वरून तुळजापूरकडे निघाले होते. तामलवाडीच्या अलीकडे सोलापूरहून तुळजापूर कडे जाणाऱ्या एमएच१४-बीटी-३४३० या एसटीच्या धडकेने तिघेजण जखमी झाले.



त्यांना मुकुंद कांबळे (शेजारी) यांनी सोलापुरात दाखल केले असता त्यापैकी योगेश हा उपचारापूर्वी मरण पावला. मयत योगेश बेल्लारे हा १०वीत शिकत होता. त्याच्या वडिलांचा कापडाचा व्यवसाय असल्याचे सांगण्यात आले. या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## पालकमंत्री विखे-पाटील मंगळवारी जिल्ह्याच्या दौऱ्यावर

### धडाकेबाज निर्णयाची जिल्ह्याला अपेक्षा

**सोलापूर** : शिंदे गट प्रणीत शिवसेना आणि भाजप युतीमधील पालकमंत्री राधाकृष्ण विखे - पाटील हे येत्या मंगळवारी (४ ऑक्टोबर) सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर पहिल्यांदाच येत असून पालकमंत्रीपदाचे सिंहासन सांभाळताना, सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठी धडाकेबाज विकासाभिमुख निर्णय घेणार की चलती का नाम गाडी याप्रमाणे लाल फितीमधील नोकरशहांकडून सुरू असलेला आहे तो कारभार पुढे रेटणारे धोरण राबवणवार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागणार आहे.




अहमदनगरचे आमदार आणि ज्येष्ठ नेते राधाकृष्ण विखे -पाटील यांच्याकडे सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची धुरा देण्यात आली आहे. दरम्यान मंगळवारी ते जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली त्या दिवशी जिल्हा नियोजन समितीची बैठक बोलली आहे. पालकमंत्र्यांविना जिल्ह्यातील विकास कामांचे जे निर्णय प्रलंबित राहिले आहेत, त्या निर्णयांना नव्या पालकमंत्र्यांकडून कितपत न्याय दिला जातो याकडे लक्ष लागून आहे. राज्यामधील तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने सोलापूर जिल्ह्यातील विकास कामांसाठी जिल्हा नियोजन समितीला ५२७ कोटींचा निधी मंजूर करून दिला होता. तथापि, तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंजूर करून दिलेल्या निधीवर कुरघोडी करून राजकारण करण्याचा प्रयत्न शिंदे - फडणवीस यांच्याकडून झाला. विद्यमान सरकारने ५२७ कोटींच्या निधीला ब्रेक लावला आहे. त्यातून विकास कामांना खो बसला आहे. हा अडलेला निधी विकास कामांसाठी मार्गस्थ होण्यासाठी नव्या पालकमंत्र्यांची सकारात्मक भूमिका असणे महत्त्वाचे मानले जात आहे.

### ...तर नवे पालकमंत्री ठरू शकतात रोषाचे धनी

शिंदे-फडणवीस नेतृत्वाने राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या रूपाने गेटकेन पार्सल पालकमंत्री दिला आहे. जिल्ह्याच्या भूमिपुत्राला या पदावर संधी न दिल्यामुळे जिल्ह्यात या निवडीवरून नाराजी आहे. अशातच नव्या पालकमंत्र्यांनी वेगळ्या राजकारणातून विकास कामांना आडकाठी आणली, विशेष करून ५२७ कोटींच्या अडलेल्या निधीचा मार्ग मोकळा न केल्यास पालकमंत्री विखे-पाटील आणखीन रोषाचे धनी होवू शकतात.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




कालपर्यंत एकमेकांविरुद्ध वाईट–वाईट काम करायचे!

कल्याण
340-71-579

## पाटलांनी केलेली ऊसदराची कोंडी परिचारकांनी फोडली

### पांडुरंग देणार २७०० ते २८०० चा दर

सुराज्य/पंढरपूर

अभिजित पाटील यांनी विठ्ठलच्या निवडणुकीत येणाऱ्या ऊस हंगामात २५०० रुपये दर जाहीर करून कारखानदारांची कोंडी केली होती. कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सोलापूर जिल्ह्यातील ऊस दराची कोंडी फोडली आहे. कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक साखर कारखाना २७ ०० ते २८०० रुपये दर येणाऱ्या सीजनमध्ये देणार असल्याची घोषणा माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी केली. साखर कारखानदारांत ऊस दराची स्पर्धा निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना चांगला फायदा होणार आहे.

विठ्ठल कारखान्याच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या दरम्यान विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी सभासदांना २५०० रुपये भाव देण्याचे जाहीर केले होते त्यामुळे इतर कारखानदारांची मोठी कोंडी झाली होती. कोट्यावधी रुपयाचे कर्ज असणारा विठ्ठल सहकारी साखर कारखाना जर पंचवीसशे रुपये दर देत असेल तर विठ्ठल पेक्षा कमी कर्ज असलेल्या कारखान्याने किती द्यावा? हा प्रश्न निर्माण झाला होता.



विठ्ठलच्या निवडणुकीत २५०० रुपये दर जाहीर केल्यानंतर पंढरपूरच्या आसपासच्या सर्वच साखर कारखानदारांनी अभिजित पाटील यांची कोंडीही केली होती. पाटील यांची विठ्ठलवर सत्ता आली तर आपल्या देखील साखर कारखान्यांना विठ्ठलच्या बरोबरीने उसाला दर द्यावा लागेल, त्या भीतीने पाटलांना साखर कारखानदारांनी कडाडून विरोध केला होता. त्यांचे पॅनल पराभूत करण्यासाठी सर्व कारखानदारांनी त्यांच्या विरोधात भूमिका घेतली होती.

विठ्ठल कारखाना कर्जात असताना दोन वर्षा मागील शेतकऱ्यांच्या उसाचे बिल हे अभिजित पाटील यांनी दिल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये त्यांच्याबद्दल मोठा विश्वास निर्माण झाला आहे. असे असताना कर्मवीर सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत परिचारक यांनी येणाऱ्या हंगामात आपल्या सभासदांसाठी २७०० ते २८०० रुपये दर देण्याचे जाहीर केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### स्पर्धेच्या दरात शेतकऱ्यांना फायदा

विठ्ठल आणि पांडुरंग कारखान्यामध्ये दराची स्पर्धा ही जुनीच आहे विठ्ठल ने २५०० रुपये भाव जाहीर केल्यामुळे पांडुरंग कारखान्याचा सुद्धा आपल्या शेतकऱ्यांना जादा दर मिळणार आहे या स्पर्धेचा फायदा हा शेतकऱ्यांना होणारा आहे. येणाऱ्या काळात ऊस दराची स्पर्धा निर्माण झाल्यास त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे.

## व्याजाच्या पैशावरून चाकूने खुनाचा प्रयत्न

### सावकाराला पोलीस कोठडी

**सोलापूर** : कर्ज आणि व्याजाची रक्कम देऊन देखील जादा पैशाची मागणी करीत चाकूने हल्ला करून खुनाचा प्रयत्न केल्याची घटना मोहोळ येथील छत्रपती हॉटेल जवळ गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली.

महेश दिलीप गायकवाड (वय ३० रा. गायकवाड वस्ती, मोहोळ) असे जखमी तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मोहोळच्या पोलिसांनी सुदर्शन सुभाष गायकवाड (रा.मोहोळ) याच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न आणि सावकारी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल केला. त्याला २ दिवसाची कोठडी घेतली. महेशने सुदर्शन कडून व्याजाने पैसे घेतले होते. सर्व रक्कम देऊन देखील त्याने जादा पैशाची मागणी केली होती. पैसे देण्यास नकार दिल्याने सुदर्शनने त्याच्यावर हल्ला केला. त्यानंतर त्यांच्या खिशातील २० हजाराचा ऐवज काढून घेतला. स.पो.नि. डुनगे तपास करीत आहेत.

# आज के ही दिन खिले थे दो फूल!

**आज २ ऑक्टोबर. एक महान दिवस. आजच्याच दिवशी दोन फुले उमलली होती ज्यांनी संपूर्ण देशाला नव्हे तर जगाला सुगंधित केले. आजच्या दिवशी भारतमातेच्या दोन सुपुत्रांनी जन्म घेतला. विशेष म्हणजे नुकतेच आपण गांधीजींच्या जन्माचे दिडशतकी वर्ष साजरे केले. महात्मा गांधीजी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, यांच्या महान कार्याची थोडक्यात ओळख...**

आज २ ऑक्टोबर. भारतासाठी आगळावेगळा दिवस. आजच्या दिवशी भारतात अशा दोन व्यक्तींनी जन्म घेतला की त्यांच्यामुळे देशाला जगामध्ये एक वेगळी ओळख मिळाली. एक राष्ट्रपिता महात्मा गांधी ज्यांना आदराने बापू संबोधले जाते आणि दुसरे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री. महात्मा गांधींजींचा जन्मदिवस संपूर्ण देशात 'गांधी जयंती' म्हणून साजरा करतात, तर संपूर्ण जगामध्ये तो 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून साजरा केला जातो. देशाच्या स्वातंत्र्यामधील बापूंच्या अहिंसक भूमिकेचे योगदान विसरता न येण्यासारखे आहे. तर दुसऱ्या बाजूला देश आज 'जय जवान, जय किसान' अशी घोषणा देणारे देशाचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचाही जन्मदिवस मोठ्या उत्साहाने आणि अभिमानाने साजरा करत आहे. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असणाऱ्या शास्त्रींनी संपूर्ण जगाला दाखवून दिले की, एखाद्याकडे आत्मविश्वास असेल तर कोणतेही ध्येय गाठणे कठीण नसते. आज गांधी यांची १५३ वी तर शास्त्री यांची ११८ वी जयंती साजरी करत असताना देशवासीयांनी त्यांच्या त्यागाचा आणि बलिदानाचा विसर पडू देऊ नये.

गांधींच्या विचाराने आणि जीवनशैलीने प्रभावित झालेल्या शास्त्रींनी गांधींच्या असहकार चळवळी दरम्यान देशसेवेचे व्रत स्वीकारले.

जातीव्यवस्थेच्या विरोधी असणाऱ्या



शास्त्रींनी आपल्या नावापुढे मूळ आडनाव न लिहिता नेहमी त्यांना मिळालेल्या 'काशी विद्यापिठाच्या शास्त्री' या पदवीचाच उल्लेख केला. ९ जून १९६४ ते ११ जानेवारी १९६६ अशा दोन वर्षापेक्षा कमी काळासाठी पंतप्रधानपदी राहिलेल्या शास्त्रींनी त्यावेळच्या भीषण मंदीच्या आणि दुष्काळी स्थितीमध्ये देशवासीयांना आठवड्यातून एकवेळ उपाशी राहण्याचे आवाहन केले होते. पुढे त्यांच्या नेतृत्वाखाली देशात हरितक्रांतीस सुरुवात झाली आणि देश यथावकाश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला. तथापि, ताश्कंदमध्ये ११ जानेवारी १९६६ रोजी या साध्या, सरळ, प्रामाणिक, निर्मळ आणि स्वाभिमानी नेत्याचा संदिग्धरित्या मृत्यू झाला.

सत्य, अहिंसा, अस्पृश्यता याबद्दल समाजजागृती करून खरी मानवता कशी असते याबाबत स्वतःच्याच जीवनाचा आदर्श आपणापुढे ठेवणाऱ्या महात्मा गांधी यांच्या विचारांची प्रासंगिकता आजही टिकून असून त्यांच्या सत्य आणि अहिंसेच्या विचारांनी जगभरातील अनेक नेते भारावून गेले तर अनेक जण त्यांनी सांगितलेल्या मार्गाचे अनुकरण करून संघर्षात यशस्वी झाले.

गांधीजी नेहमी म्हणत, शरीर आणि मन अस्वच्छ असेल, तर परमेश्वर कधीच प्राप्त होऊ शकणार नाही तथापि, माणसांनी तना-मनाने स्वच्छ राहण्यासाठी त्यांची गावे, शहरे आणि परिसरही स्वच्छ ठेवावयास हवा. पृथ्वी, हवा, भूमी आणि पाणी हे सर्व आपणास वारसा हक्काने मिळाले नसून ती पुढील पिढ्यांसाठीची जोखीम असून ती किमान जशीच्या तशी त्यांच्या हाती सोपवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

आज समाजात व्यसनाधीनता, गुन्हेगारी, अतिरेकी कारवाया यांचे प्रमाण वाढले असून त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक ऐक्यास बाधा आणणारी कृत्ये घडत आहेत. श्रमाला कमी महत्व दिले जात असले तरी श्रमदानामुळेच मनुष्य स्वावलंबी बनतो. व्यसनाधीनतेमुळे सर्व क्षेत्रात हानी होत असून वाहनांचे अपघात, महिलांचे बळी, आत्महत्या, निष्पाप व निरागस मुलांच्या हत्या, घडत आहेत. तेव्हा गांधी-शास्त्री जयंतीच्या निमित्ताने सत्य, अहिंसा, साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि निरोगी आरोग्यमान या पंचसूत्रीचा अवलंब प्रत्येकाने विशेषतः युवा पिढीने करावा आणि समाजसुधारणे बरोबरच व्यसनाधीनता नाहीशी करून 'विज्ञाननिष्ठ' भारत घडवू या !!

**- प्रा. विजय कोष्टी, जि. सांगली.**

# शिस्तप्रिय व्यक्तिमत्व

माणसं जन्माला येतात पण काही माणसं इतिहास निर्माण करतात. सोलापूर जिल्ह्यात नव्हे संपूर्ण कर्नाटक व महाराष्ट्रात राजकीय,सामाजिक,अध्यात्मिक, शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सर्वच क्षेत्रात इतिहास निर्माण करणारे व्यक्तिमत्व म्हणजे दुधनींचे माजी नगराध्यक्ष व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संस्थापक सभापती-लोकनेते स्व. सातलिंगप्पा संगप्पा म्हेत्रे हे होत. त्यांचा आज स्मृतीदिन....



संपूर्ण महाराष्ट्र -कर्नाटकातील लोहपुरुष म्हेत्रे यांचे नाव राजकीय पटलावर अग्रस्थानी घेतले जाते. उत्तुंग व्यक्तिमत्व , शब्दप्रभुत्व आणि वेळेला महत्त्व देणारे शिस्तप्रिय व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती होती. म्हेत्रे यांचा जन्म २१ नोव्हेंबर १९३१ रोजी झाला.लहानपणापासून कुस्तीची आवड असल्याने व्यायाम आणि कुस्तीचा फड गाजविणे हा त्यांचा छंद असायचा. सहा फूट उंच, धिप्पाड शरीरयष्टी, रुबाबदार व्यक्तिमत्व ,पांढरा नेहरू,शर्ट,धोतर,टोपी,हातात छत्री हा त्यांचा पेहराव असायचा.अक्कलकोट,कलबुर्गी,अफजलपूर,आळंद या तालुक्यात त्यांचा खूप मोठा दबदबा होता.

राजकारणाबरोबर समाजकारणात आपल्या अजोड कार्याची लखलखीत मुद्रा सर्वसामान्यांच्या हृदयावर उमटिवणारे दुधनींचे कार्यसम्राट म्हणून त्यांचे नेतृत्व होते. सामाजिक कार्याची त्यांना आंतरिक तळमळ होती. ते अखेरच्या श्वासापर्यंत काँग्रेस पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते राहिले. त्यांनी गोरगरीब जनतेला व वंचित घटकाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.त्यामुळे प्रत्येक गावात त्यांचा मित्रपरिवार वाढत गेला. हातात घेतलेले काम तडीस नेण्याची त्यांची हातोटी होती. म्हेत्रे यांनी तब्बल ५० वर्षे दुधनीचे नगराध्यक्ष म्हणून कार्य केले. हे महाराष्ट्रातील नव्हे,भारतातील इतिहास आहे. एकच व्यक्ती ५० वर्षे नगराध्यक्ष पद भूषविलेली व्यक्ती म्हणजे म्हेत्रे होत.

ते कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती होते.दुधनी विविध कार्यकारी सोसायटीचे ते १५ वर्षे चेअरमन होते अशी अनेक पदे त्यांनी भूषविले आहेत. म्हेत्रे हे १९५२ पासून जवळ जवळ ५० वर्ष नगराध्यक्ष होते. ५ वर्ष अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती होते. तालुक्यात व कर्नाटकातील आळंद,अफझलपूर येथे सुध्दा त्यांचा दरारा होता. ते चालते बोलते न्यायालय होते. कोर्टातील अवघड केसेस ते सहजरित्या सोडवित होते. अक्कलकोट माजी आमदार कै.भाई छन्नूसिग चंदेले, श्रीमती निर्मलाराजे भोसले, बी.टी.माने, पार्वतीबाई मलगोंडा यांच्या विजयात म्हेत्रे यांचा सिंहांचा वाटा होता. सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील, मुरूमचे माजी नगराध्यक्ष माधवराव पाटील, अनगरचे बाबूराव आण्णा पाटील यांचा दोस्ताना खास होता. म्हेत्रे हे अखेरपर्यंत काँग्रेसचे पाईक होते. देशाचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या विजयात देखील त्यांचा वाटा होता. त्यांचे सुपुत्र माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे हे गृहराज्यमंत्री झाल्या नंतर त्याचे सार्थक झाले. म्हेत्रे यांचा ६१ वा वाढदिवस लोकसेवा युवक आघाडीने साजरा केला. त्या वेळी महाराष्ट्र व कर्नाटकातील एक लाख लोक उपस्थित होते. सहस्रचंद्रदर्शन कार्यक्रमास देखील काँग्रेसचे नेते सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री धरमसिंग, खा.मल्लिकार्जुन खरगे, बी.आर. पाटील, आ.प्रणिती शिंदे उपस्थित होते. यावेळी देखील मोठ्या प्रमाणात जनसमुदाय उपस्थित होता. यावरून त्यांची लोकप्रियता समजून येते. तालुक्यासह जिल्हयाच्या राजकारणातील मातब्बर नेते म्हणुन ओळख असलेले सातलिंगप्पा संगप्पा म्हेत्रे वयाच्या ९० व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला.जुन्या -नव्या पिढीसोबत जनसंपर्काच्या माध्यमातुन नाळ जोडुन होते. त्यांच्या नेतृत्वात अनेक राजकारणी घडले आहेत. तालुक्यातील कोणतीही निवडणूक असो त्याची चर्चा दुधनीतील सातलिंगप्पा यांच्या कटयावर झाली नाही, असे कधीच झाले नाही. त्यांच्या व्दितीय पुण्यस्मरण दिनानिमित्त विनम्र अभिवादन..!

**- रविकांत धनशेट्टी, अक्कलकोट.**

# निष्णात धन्वंतरी कै. डॉ. श्याम तोष्णीवाल

**महान जागतिक कीर्तीचे तसेच सोलापूरचे सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ कै. डॉ. श्याम तोष्णीवाल यांची आज ७वी पुण्यतिथी पाळली जात आहे. त्यानिमित्त थोडक्यात त्यांच्या जीवन प्रवास.** रुग्णसेवा आणि समाजसेवा हे संस्कृतीचे दोन-आधारस्तंभ आहेत जीवनात त्यांनी रुग्ण सेवेच्या माध्यमातून आदर्श जीवनाची इमारत अतिशय विनम्र सेवेने यशकिर्तीच्या शिखरावर पोहोचवली. समाजसेवेचा आदर्श जोपासला. वैद्यकीय क्षेत्रातील तसेच शैक्षणिक क्षेत्रातील रहस्य योग्य शब्दात उलघडून दाखविणे खरोखरच कठीण आहे. जिल्ह्यातील कितीतरी नेत्ररुग्णांना आपल्या बहुमोल सेवेतून नेत्र सेवा मोलाची त्यांनी करून दाखविली.




रिमांड होमसारख्या अत्यंत महत्त्वाच्या संस्थेत सलग २० वर्षे आदर्श सचिव म्हणून काम केले. या उल्लेखनीय कामाचे आदर्श सर्व क्षेत्रात घेण्यासारखे ठरले. सन १९९७ साली जिल्ह्याचे कलेक्टर यांनी दमाणी नगरातील अंध शाळेचे कार्य बघून त्यांनी सोलापूर येथील शासकीय रिमांड होमचे सचिव म्हणून कै. श्याम तोष्णीवाल यांची निवड केली. रिमांड होमचा चार्ज घेताच त्यांनी तेथील मुला-मुलींच्या अन्न, वस्त्र व शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून अद्यावत सुंदर डायनिंग हॉल, विद्यार्थ्यांसाठी बाक, मुलींसाठी स्वतंत्र स्नानगृह, शौचालयाची व्यवस्था केली. आधुनिक व्यायामशाळा चालू केली, मिराबाईच्या स्मरणार्थ लायब्ररी चालू केली. ग्रंथालय सुरू केले. लहान बाळासाठी शाळा सुरू केली व वरील सर्व. कामाची पाहणी करून शासनाने महाराष्ट्र राज्य पर्यवेक्षक आणि अनुरक्षण संघटना, पुणे यांनी संपूर्ण महाराष्ट्रात जेवढे रिमांड होम आहेत,त्यावर त्यांची उपाध्यक्ष म्हणून निवड केली. त्यांनी महाराष्ट्रातील सर्व रिमांड होममधील विद्यार्थ्यांना कलागुणांना वाव मिळण्यासाठी किलबिल हे त्रैमासिक चालू केले. प्रत्येक रिमांड होममध्ये गणेश उत्सव चालू केला. त्यामध्ये चांगल्या विचारांचे व्याख्यानमाला चालू केली.

**- डॉ. वसंतराव लवंगे, नरखेड.**

# कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व

**पूर्वभागातीलच नव्हे तर जिल्ह्यातील अग्रगण्य शिक्षणसंस्थांमध्ये पद्मशाली शिक्षण समूहाचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. ही संस्था नावारूपाला आणण्यासाठी ज्या धुरीणांनी कष्ट घेतले त्यामध्ये संस्थेचे विद्यमान सचिव दशरथ गोप यांचा समावेश होतो.**

तेलंगणातून दीडशे वर्षांपूर्वी आलेल्या तेलुगू भाषिक पद्मशाली बांधवांनी स्थापलेल्या या संस्थेचा नावलौकिक आज संपूर्ण महाराष्ट्रात आहे. अनेक वर्षे सचिवपद सांभाळणाऱ्या गोपसाहेबांसाठी ही अतिशय अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्रात अनेक शिक्षणसंस्थांचे कर्तृत्ववान सचिव असतील पण त्या सर्वांपेक्षा वयाने लहान असूनही गोपसाहेबांनी लक्षणीय यश संपादन केले आहे.



युवावस्थेत असल्यापासून गोप यांना समाजकार्याची आवड आहे. त्यांना हा वसा व वारसा आपल्या वडिलांकडून मिळाला आहे. माणूस ओळखण्याचे कौशल्य, परिस्थितीचे गांभीर्य समजून घेण्याची मानसिक व बौद्धिक ताकद, हाती घेतलेले प्रत्येक काम पूर्णत्वास नेण्याची कळकळ, समोरच्यास आपलेसे करून घेण्याची वृत्ती, योग्य निर्णय योग्य वेळी घ्यायचे कसब, संपूर्ण व चोहोबाजूने नियोजन या विविध गुणांमुळे त्यांचे नेतृत्व दिवसेंदिवस अधिक प्रगल्भ, प्रभावी व परिपक्व होत आहे. तसे ते मितभाषी असले तरी एखादा आवडीचा विषय निघाला तर ते भरभरून बोलतात. त्यांचे बोलणे कोरडे नसते. अस्सल विनोदाची फोडणी त्या संवादांना असते. ऐकणाऱ्यांची हसून मुरकुंडी वळावी, असे किस्सेही त्यांच्याकडे आहेत. प्रवासाची आवड असल्याने त्यांनी अनेक ठिकाणी भेटी दिल्या आहेत. त्याही अनुभवाचा त्यांच्यापाशी खजिना आहे. तो त्यांनी उलगडायला सुरुवात केली की तिथून उठून जायला नको वाटते. ते सदैव उत्साही, कार्यरत आणि त्यामुळे सजग असतात.पद्मकला महोत्सव किंवा संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजिलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी तयारी करत असताना त्यांचा सहवास लाभला व काही महत्त्वाच्या गोष्टी शिकायला मिळाल्या. पूर्वनियोजनाशिवाय यश अशक्य आहे असे ते म्हणतात. खूप आधीपासूनच नियोजन केल्यास त्यातील त्रुटी आपल्याला कळतात व त्यामध्ये वेळीच बदल करता येतो हा त्यांचा विचार त्यांच्या यशाचे रहस्य सांगून जातो. अनेक हिंदी, तेलुगू गाणी त्यांच्या स्मरणात आहेत. विद्यार्थ्यांसाठीचा एखादा सांस्कृतिक कार्यक्रम कसा असावा याबद्दलची अचूक जाण त्यांना आहे. पहिल्यापासूनच त्यांच्या स्वभावात विविध क्षेत्रातल्या नवीन गोष्टी जाणून घेण्याची इच्छा दडलेली आहे. बारकाईने अभ्यास करण्याच्या व अचूक निर्णय घेण्याच्या त्यांच्या सवयींमुळेच त्यांना आत्तापर्यंत उदंड यश मिळाले आहे. यापुढेही त्यांची अशीच उदंड प्रगती होत राहो अशी मुनी मार्कंडेय चरणी मनोमन प्रार्थना. जन्मदिनाच्या अनेकानेक शुभेच्छा !

**- प्रशांत देशपांडे, सोलापूर.**

# राशीभविष्य

## दि. ०२ ऑक्टोबर ते ०९ ऑक्टोबर २०२२

### सहनशीलता ठेवा




षष्ठस्थानातून अष्टमस्थानाकडे चंद्राचे भ्रमण होत आहे. सप्ताहातील सर्वच दिवसांचा कालावधी जपून हाताळावा लागेल. अमावस्या ही षष्ठस्थानातून होत आहे. सध्या नवीन काहीही न करता शांत राहिलेले चांगले. प्रत्येक गोष्टीमध्ये नियोजन महत्त्वाचे राहील. नोकरदार वर्गाला सहनशीलता ठेवावी लागेल. व्यवसायात पूर्वीपेक्षा अधिक श्रम वाढवावे लागतील. उधारीचे व्यवहार टाळा. आर्थिक बाबतीत खर्च कमी करा. वयोवृद्ध व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घ्या. प्रकृतीची काळजी घ्या. **शुभ दिनांक : २८, २९ महिलांसाठी : दोन शब्द कमी बोललेले चांगले.**

### सुवर्णमध्य साधाल




दिनांक २८, २९ रोजी ठरवून कोणतीही गोष्ट होणार नाही. त्यात चढउतार राहील. मात्र या चढउताराच्या नादी लागूच नका. हे दोन दिवस आपल्या हातचे नाहीत हे लक्षात ठेवूनच वाटचाल करा. अमावस्या चांगला प्रस्ताव घेऊन येईल व नवरात्र उत्सवाला सुरुवातही चांगली होईल. बाकी दिवसांचा कालावधी उत्तम जाईल. नोकरदार वर्गाचे व्यवस्थापन ज्येष्ठांना पटणारे असेल. व्यवसायमार्फत होणारी नवी ओळख ही नफा वाढवणारी ठरेल. मिळणारे उत्पन्न योग्य ठिकाणी गुंतवा. **शुभ दिनांक : २६, २७, महिलांसाठी : धावपळ झाली तरी चांगल्या कामासाठीच होईल.**

### अनावश्यक खर्च टाळा




दिनांक ३० व १ हे दोन दिवसांचा कालावधी विचार करून बोलावे लागेल. प्रत्येक गोष्टीत अंदाज वर्तवून चालणार नाही. शिवाय इतरांनी सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवणे त्रासाचे राहील. तेव्हा या दिवसात स्वत:हून व्याप वाढवून घेऊ नका. संयम ठेवा. अमावस्या प्रहरात मर्यादित गोष्टी करा. नवरात्रारंभ व बाकी दिवस चांगले जातील. नोकरदार वर्गाच्या संशोधनात्मक गोष्टी यशस्वी होतील. राजकीय क्षेत्रात जबाबदारीच्या गोष्टी हाताळाव्या लागतील. कौटुंबिक कलह दूर ठेवा. आध्यात्मिक गोष्टीत मन रमेल. आहाराचे पथ्यपाणी सांभाळा.

**शुभ दिनांक : २७, २९ महिलांसाठी : चर्चा करणे टाळा.**

### अनुकूल सप्ताह




सप्ताहात सर्व दिवस चांगले असतील. चांगले प्रस्ताव समोर येतील. बऱ्याच वेळा प्रयत्न करूनही थांबावे लागत होते. सध्या मात्र या चांगल्या गोष्टींना गती मिळणार आहे. अमावस्या पराक्रम स्थानातून होत आहे. नवरात्र उत्सवाची सुरुवातही मोठ्या उत्साहाने कराल. नोकरदार वर्गाला कामकाजात येणारे तांत्रिक अडथळे दूर होतील. व्यावसायिकदृष्ट्या झालेली संभ्रमावस्था कमी होईल. धाडसी निर्णय घेणे शक्य होईल. गुंतवणूक वाढेल. आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. सामाजिक क्षेत्रात अनेकांशी संपर्क साधाल. मुलांना वेळ द्याल. घरामध्ये एखादा महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा होईल. जोडीदाराचे सहकार्य मिळेल. धार्मिक गोष्टींतील उत्साह वाढेल. एकूण सप्ताह अनुकूल असेल. प्रकृतिस्वास्थ्य उत्तम राहील. **शुभ दिनांक : ३०, १, महिलांसाठी : तांत्रिक अडचणी कमी होतील.**

### मानसिक समाधान लाभेल





दर आठवड्याला कोणता ना कोणता तरी दिवस हा चढउतारांचा राहतो. मात्र आता या आठवड्यात तसे न होता सर्व दिवस चांगले जातील. अमावस्या प्रहरसुद्धा चांगला जाईल. नवरात्रौत्सवाची सुरुवात चांगली होईल. एखाद्या गोष्टीच्या मागे लागूनसुद्धा ते काम न होणे असा त्रास होत होता, तो तुम्ही भोगला. सध्या कोणाच्या मागे लागण्याची गरज भासणार नाही. स्वत:च्या कर्तृत्वावरच सर्व कामे मार्गी लावाल. नोकरदार वर्गाचे वर्चस्व वाढेल. व्यवसायात उलाढालीचा व्याप उत्तम राहील. आगामी काळासाठी केलेल्या तरतुदीचा फायदा होईल. आर्थिक सक्षमता येईल. सर्वांगीण विकास घडेल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या सल्ल्याने महत्त्वाचे निर्णय घ्या. मानसिक समाधान लाभेल. प्रकृती चांगली राहील. **शुभ दिनांक : २६, ३०, महिलांसाठी : अडचणी दूर होतील.**

### नियोजन पूर्ण होईल




अमावस्या तुमच्या राशीतूनच होत आहे. नवरात्रोत्सवाची सुरुवात आनंदाची असेल. सप्ताहातील सर्व दिवसांचा कालावधी हा चांगला राहील. प्रत्येक गोष्टीसाठी आता पर्यायी मार्ग स्वीकारावा लागणार नाही. स्वत:च्या मतावर ठाम राहून निर्णय घ्याल. ते यशस्वी होतील. थोडासा निवांतपणा वाटेल. कोणतेही नियोजन परिपूर्ण होईल. नोकरदार वर्गाचे कामकाज सुरळीत चालू राहील. आर्थिक लाभ होईल. राजकीय क्षेत्रातील कामकाजाला गती येईल. कुटुंबातील सदस्यांना विश्वासात घ्या. धार्मिक गोष्टीत सहभाग राहील. आरोग्य उत्तम राहील. **शुभ दिनांक : २६, २७, महिलांसाठी : हजरजबाबीपणा राहील.**

### नियमांचे पालन करा




दिनांक २५, २६, २७ अशा या तीन दिवसांच्या कालावधीत सहजवारी कोणतीही गोष्ट करून चालणार नाही. काही चांगल्या गोष्टींसाठी बदल स्वीकारा. माझेच खरे करत बसू नका. इतरांचा सल्ला घेताना दगाफटका होणार नाही याची काळजी घ्या. कुठेही उग्र रूप धारण करू नका. एकाच गोष्टीवर अडून राहणे टाळा. कायदा क्षेत्रात नियमांचे पालन करा. अमावस्या शांततेत पार पाडा. नवरात्र उत्सवाचा आरंभ आनंदाने साजरा करा. नोकरदार वर्गाचा कामातील अनुभव चांगला असेल. व्यवसायात स्वत:ला कष्ट सोसावे लागले तरी चालतील. मात्र भागीदारी व्यवसायात पडू नका. रोखीच्या व्यवहारांना महत्त्व द्या. आर्थिक बचत करा. राजकीय क्षेत्रात पुढारकीपणा टाळा. कुटुंबातील व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घ्या. स्वत:चेही आरोग्य जपा. **शुभ दिनांक : २८, २९, महिलांसाठी : कामे वेळेत पूर्ण करा.**

### भावनिक निर्णय टाळा




दिनांक २८, २९ रोजी अचानकपणे असे काही प्रस्ताव समोर येतील. त्यामध्ये भावनिक निर्णय घ्यावेसे वाटतील. मात्र, कोणत्याही परिस्थितीत भावनिक निर्णय टाळा. व्यावहारिक गोष्टींनाच महत्त्व द्या. बाकी दिवसांचा कालावधी चांगला जाईल. अमावस्या लाभस्थानातून होत आहे. नवरात्रौत्सवाची सुरुवात समाधानकारक असेल. नोकरदार वर्गाला वेळेनुसार व्यवस्थापन करावे लागेल. व्यवसायात ग्राहकांच्या सोयीसाठी योग्य उपाययोजना राबवाव्या लागतील. नाशिवंत मालाची खरेदी मोठ्या प्रमाणात करणे टाळा. आर्थिक बाबतीत हिशोब चोख ठेवा. मित्र-मैत्रिणींसोबत पर्यटनस्थळाला भेट द्याल. मुलांचे लाड पुरवाल. जोडीदाराचा रुसवाफुगवा वेळीच दूर करा. प्रकृतीची काळजी घ्या. **शुभ दिनांक : ३०, १, महिलांसाठी : धावपळ कमी करा.**

### हिशेबाची नोंद ठेवा




दिनांक ३० आणि १ असे हे दोन दिवस मनस्ताप होणाऱ्या गोष्टींपासून लांब राहा. स्वत:ची कामे इतरांना सांगू नका. इतरांवर अवलंबून राहणे त्रासाचे राहील. कारण नसताना वाद वाढवू नका. क्रोधाला आवर घाला. बाकी दिवस उत्तम असतील. अमावस्या प्रहर ठीक राहील. नवरात्रौत्सवाची सुरुवात चांगली होईल. नोकरदार वर्गाने कामाच्या बाबतीत सतर्क राहावे लागेल. आर्थिक बाबतीत खर्च कमी करा. स्वार्थी मैत्रीपासून लांब राहा. घरगुती वातावरण ठीक राहील. शारीरिकदृष्ट्या योगसाधनेला महत्त्व द्या. **शुभ दिनांक : २८, २९ महिलांसाठी : जिद्द सोडू नका.**

### आर्थिक लाभ होईल




भाग्यस्थानातून लाभस्थानाकडे चंद्राचे भ्रमण होत आहे. सर्व दिवसांचा कालावधी उत्तम जाईल. अशा या संधीचा फायदा घेऊन थांबलेल्या गोष्टींना गती द्या. उद्याचे कामही आजच करण्याचे नियोजन करा. इतरांचे सहकार्य उत्तम मिळेल. अमावस्या भाग्यस्थानातून होत आहे. नवरात्रोत्सवाचा आरंभाचा दिवस आनंदीदायक असेल. नोकरदार वर्गाला कामाच्या ठिकाणी होणारे नुकसान टाळता येईल. कामात चांगले बदल होतील. राजकीय क्षेत्रात उत्साह वाटणार नाही. नातेवाईकांशी सलोखा वाढेल. भावंडांना समजून घ्याल. धार्मिक गोष्टीत उत्साह राहील. मानसिक शांती लाभेल. आरोग्य साथ देईल. **शुभ दिनांक : २६, ३०, महिलांसाठी : आनंदाचे क्षण अनुभवाल.**

### मध्यस्थी करू नका




दिनांक २५, २६, २७ असे हे तीन दिवस शब्दाने शब्द वाढणार आहे. तेंव्हा बोलण्यावरती नियंत्रण ठेवा. ज्या गोष्टींची आवश्यकता नाही अशा गोष्टींचा क्षणिक मोह आवरा. इतरांच्या वैयक्तिक गोष्टीत हस्तक्षेप करणे टाळा. समयसूचकतेने काम करा. अमावस्या अष्टमस्थानातून होत आहे. शांत राहा. नवरात्र उत्सवाचा श्रीगणेशा शांततेने करा. नोकरदार वर्गाला कामाच्या ठिकाणी वरिष्ठांकडून नियमावली जाहिर होईल. व्यवसायातून मनासारखे उत्पन्न मिळवता येईल. अनेक ठिकाणांहून आलेल्या संधी सोडू नका. आर्थिकदृष्ट्या उधारीचे व्यवहार टाळा. राजकीय क्षेत्रात जबाबदारी वाढेल. नातेवाईकांशी संवाद साधताना मध्यस्थी करायला जाऊ नका. शेजाऱ्यांशी दोन हात लांब राहा. प्रकृतिस्वास्थ्य जपा. **शुभ दिनांक : २८, २९ महिलांसाठी : कामाचा व्याप वाढवू नका.**

### वैवाहिक सौख्य उत्तम




दिनांक २८, २९ या दोन दिवसांत ताकसुद्धा फुंकून प्यावे लागेल. ज्या गोष्टींविषयी खात्री नाही अशा गोष्टींची चर्चा करू नका. नकळत आपल्याकडून होणाऱ्या चुकांकडे दुर्लक्ष करू नका. बाकी दिवस चांगले असतील. अमावस्या काळात मोठे बदल घडतील. नवरात्रौत्सवाची सुरुवात चांगली राहील. आर्थिक घडामोडी चांगल्या होत राहतील. समाजसेवेत स्वत:ला वाहून घ्याल. कुटुंबातील सदस्यांची आवड-निवड जपा. वैवाहिक सौख्य उत्तम राहील. धार्मिक गोष्टीतून आनंद मिळेल. योगसाधनेला महत्त्व द्या. **शुभ दिनांक : ३०, १, महिलांसाठी : अतिसाहस करू नका.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# दिवाळीपर्यंत विमानसेवा सुरु न झाल्यास चक्री उपोषण करणार

## नरसिंह मेंगजी, राजेश काळे यांचा निर्धार; सोलापूर विकास मंचची बैठक



**सोलापूर** : दिवाळी पर्यंत होटगीरोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू न झाल्यास आम्ही सर्व सोलापूरकरांना घेऊन चक्री उपोषण करणार असल्याचा निर्धार माजी आमदार नरसिंह मेंगजी आणि माजी उपमहापौर राजेश काळे यांनी सोलापूर विकास मंचच्या बैठकीत व्यक्त केला आहे. जोवर सामान्य जनतेला विमानसेवा नाही तोवर मंत्री आणि व्हि.व्हि.आय.पींना देखील विमानसेवा कायमस्वरूपी बंद करा असा ठराव आजच्या बैठकीत मंजूर करण्यात आला.

होटगी रोड विमानतळाबाबत सोलापूर विकास मंचच्या वतीने शासकीय विश्रामगृहात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत वरील सूर व्यक्त करण्यात आला. नागरी विमानसेवा सुरू करण्यासाठी अथक परिश्रम सुरु आहेत. केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री, मुख्यमंत्री आणि संबंधित विभागाला वेळोवेळी विनंतीपर निवेदने व्यक्तीगत भेटुन सोलापूरच्या विमानसेवे संदर्भात देण्यात आलेली आहेत, तरी देखील ह्या सगळ्यांच्या प्रयत्नांना सकारात्मक असे यश आले नसल्याने सोलापूरकरांच्या भावना तीव्र असल्याचे बैठकीत अनेकांनी सांगितले. सामान्य सोलापूरकरांच्या शांततेचा अंत जिल्हा प्रशासन पाहत असून त्यांच्या वतीने होणाऱ्या दफ्तर दिरंगाईबद्दल सोलापूरकरांच्या नाराजीचा सूर असून त्याचा परिणाम येणाऱ्या काळात अत्यंत तीव्र स्वरूपांचे उद्रेकात्मक आंदोलन होणार असल्याची कल्पना बैठकीत देण्यात आली.

यावेळी सोलापूर विकास मंचचे सदस्य केतन शहा, मिलिंद भोसले, योगीन गुर्जर, गणेश पेनगोंडा, विजय कुंदन जाधव, आनंद पाटील, अनंत कुलकर्णी, प्रतिक खंडागळे, ॲड. दत्तात्रय अंबुरे, मनोज क्षीरसागर, कैलास लांडगे, सुहास भोसले, जयश्री तासगावकर, गौरी आंमडेकर, अनिता कुलकर्णी, डॉ. सुभाष वैकुंठे, डॉ. दीलीप बुरटे, अरविंद रंगा, बालकृष्ण अवदुत, भक्ती जाधव, भारत कसबे, गणेश शिलेदार, नागनाथ मेंगाणे, इक्बाल हुंडेकरी, रमेश खुने, दत्तात्रय जमादार, नितीन बिज्जरगी, डॉ. अमोल गोडसे, काशीनाथ भतगुणगी आदी उपस्थित होते.














## सुवर्ण पदक मिळवणाऱ्या सर्वेशचा महास्वामींकडून सत्कार

सुराज्य/सोलापूर : आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत सुवर्णपदक मिळवल्याबद्दल सर्वेश पोफलिया याचा सत्कार खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी यांच्या हस्ते करण्यात आला. क्लब कॉमनवेल्थ चॅम्पियनशिप आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धा इंग्लंडमधील बर्निंगहम येथे झाली. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत सोलापूरच्या सर्वेश फोफलियाने दक्षिण आफ्रिकेच्या स्पर्धकास हरवत सुवर्ण पदक प्राप्त केले. सर्वेश एस. आर. चंडक प्रशालेत ९ वी त शिक्षण घेत आहे. त्याला रुद्रा कराटे ॲकॅडमीच्या प्रशिक्षक भुवनेश्वरी जाधव, संगीता जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी आई सरिता फोफलिया, वडील निलेश फोफलिया, श्रीनिवास दायमा आदी उपस्थित होते.

## गोठ्याला आग लावून धमकी दिली; दोघांविरुध्द गुन्हा

सुराज्य/सोलापूर : शेतातील गोठ्याला आग लावली. त्यानंतर दोघा अनोळखी इसमानी दगडफेक करीत यापुढे असेच नुकसान करणार अशी धमकि देऊन पसार झाले. ही घटना चिखर्डे (ता. बार्शी) येथील आपुने यांच्या शेतात गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली. अक्षय तुकाराम आपुने (वय २० रा. चिखर्डे) यांनी पांगरी पोलिसात फिर्याद दाखल केली. गुरुवारी रात्री १० वाजेच्या सुमारास त्यांच्या शेतातील गोठ्याला दोघा अनोळखी इसमाने आग लागली होती. हे समाजानंतर अक्षय आपुने हे आज विझण्यासाठी शेतात गेले होते. त्यावेळी दोघा अनोळखी इसमांनी अंधारात त्यांच्यावर दगडफेक केली. हवालदार मुंडे पुढील तपास करीत आहेत.

# अक्कलकोटमध्ये मुले पळविली जात असल्याची अफवा

## जळगावमधील महिलेला विनाकारण पकडले; चौकशीअंती सोडले

सुराज्य/अक्कलकोट




अक्कलकोट तालुक्यातुन लहान मुले पळविले जात असल्याचे अफवा जोरदार पसरविले जात आहे. यामुळे पालक व शाळा शिक्षक वर्गातून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अफवावरून अक्कलकोट स्वामी समर्थ दर्शनासाठी आलेल्या एका महिला भक्ताला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. मात्र चौकशीत ते जळगावचे स्वामी भक्त असल्याचे निष्पन्न झाले आहे. दुधनी येथे सुध्दा दोन मुली पळविल्याचे अफवा पसरविल्या होत्या. यावर पोलिसांनी मात्र असे काहीच घटना तालुक्यात घडले नाही. अफवा पसरविण्यावर कारवाईचे संकेत दिले आहेत.

मागील काही दिवसापासून अक्कलकोट तालुक्यात लहान मुले पळविणारी टोळी कार्यरत असल्याचे अफवाचे बीज गैरसमजातून पेरले जात आहे. यावरूनच दोन दिवसांपूर्वी अक्कलकोट येथील स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी जळगाव येथून दोन महिला स्वामी भक्त आले होते. तेव्हा एका महिलेला मानसिक आजार असल्याने ती वेडसर दिसत होती. यावरून बेडर गल्ली परिसरात थांबलेल्या त्या महिलेला पकडून मारहाण करण्याच्या मूडमध्ये असलेल्या लोकांना तिने तात्काळ आधार कार्ड दाखवले. तरीही समाधान न झालेल्या लोकांनी अखेर पोलिसांच्या स्वाधीन केले. पोलिसांनी सखोल चौकशी केली असता जळगाव येथील चांगले नागरिक असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून त्यांना सोडून देण्यात आले. दुधनी येथील दोन लहान मुलींना पळविल्याचा कथित व्हिडीओ व्हायरल तालुक्यात सुसाटपणे करण्यात आला होता. आशा प्रकारच्या अफवा मुळे प्रत्येक शाळेत आणून सोडताना व शाळा सुटल्यावर परत घेऊन जाताना शाळेकडून संमधीत पालकांचे सह्या घेतले जात आहेत. परिणामी सर्वांनाच काम वाढवले आहे. यावर पोलिसांनी अफवा पसरविणाऱ्या वर कडक कारवाईचे संकेत दिले आहेत. यामुळे हौशी लोकांना सोशल मिडियाचे वापर करताना काळजी घेणे आवश्यक आहे. अन्यथा गैरवापर करणे महागात पडणार आहे.

### अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल : गौर

अक्कलकोट तालुक्यात आशा प्रकारचे घटना अद्याप घडले नाही. यामुळे नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. तसं काही वाटल्यास ११२ नंबरला कॉल करावे. तात्काळ मदत मिळेल. कोणीही कायदा हातात घेण्याचे प्रयत्न करू नये. तसेच अफवा पसरवून नये. अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिह गौर यांनी दिला आहे.

## जि.प.च्या ग्रामीण पुरवठा विभागात भ्रष्टाचार : आ. माने

सुराज्य/सोलापूर



गेले महिनाभर झेडपीतील ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या टेंडर मध्ये मोठा भ्रष्टाचार होत असल्याच्या चर्चेने जिल्ह्यात खळबळ उडवून दिले आहे. मोहोळचे आमदार यशवंत माने यांनी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पुरवठा विभागात टेंडरच्या कामांमध्ये मोठा भ्रष्टाचार होत आहे या भ्रष्टाचारामध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी वेळीच लक्ष घालणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले आहे.

सध्या जिल्ह्यात ग्रामीण भागामध्ये नळ पाणीपुरवठ्याचे मोठ्या प्रमाणामध्ये कामे सुरू असून अनेक गावांना नळ पाणीपुरवठा योजनेतून नळ जोडणीचे कामे सुरू आहेत. या कामात शासनाने आणि केंद्र शासनाने मिळून मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. कोट्यवधींची कामे ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनेवर सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये पहिल्या टप्प्यातील जवळपास ९६ कोटीची कामे सुरू आहे. या कामाच्या संदर्भामध्ये जिल्ह्यातील केवळ तीनच ठेकेदारांना या टेंडरचे कामे दिल्याने जिल्ह्यात मोठा गोंधळ उडाला आहे. या टेंडर नोटीस प्रक्रियेमध्ये काही ठेकेदारांचे ३६ कोटीचे टेंडर भरलेले होते मात्र त्या टेंडरमध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आले म्हणून ते टेंडर पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक कोळी यांनी ते बाजूला काढले. त्यामुळे मोठा गोंधळ उडाला सरसकट कामे ठेकेदारांना काम देणे गरजेचे असताना केवळ मर्जीतील ठेकेदारांना आणि जो कोणी जास्तीत जास्त लक्ष्मी देईल अशाच ठेकेदारांना ही टेंडर पास केले असल्याचा आरोपही आमदार माने यांनी केला हा जिल्हा परिषदेमध्ये चाललेला सावळा गोंधळ त्वरित थांबायला हवा, असे माने यांनी म्हटले आहे.

## शोभेच्या दारू विक्री परवान्यासाठी १० पर्यंत मुदत

सुराज्य/सोलापूर : जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) दिवाळी सणासाठी शोभेच्या दारू विक्रीच्या (फटाके विक्री) तात्पुरत्या परवान्यासाठी २८ सप्टेंबर २०२२ पासून अर्ज करता येणार आहेत. तर १० ऑक्टोबर २०२२ पर्यंत अर्ज सादर करण्याची मुदत आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी शमा पवार यांनी दिली.

तात्पुरत्या परवान्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज सेतू कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर येथे उपलब्ध आहेत. परिपूर्ण माहिती भरलेले अर्ज सर्व कागदपत्रासह दुय्यम चिटणीस शाखा, जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे १० ऑक्टोब पर्यंत जमा करावेत. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच अधिक माहितीसाठी दुय्यम चिटणीस शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर येथे दूरध्वनी ०२१७ - २७३१०२० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अपर जिल्हादंडाधिकारी पवार यांनी केले आहे.

## तंबाखू आणि एड्सबाबत जनजागृती करा

### जिल्हाधिकारी शंभरकर यांच्या सूचना

सुराज्य/सोलापूर



तंबाखू खाल्याने आजार येतो आणि मृत्यूही होत असल्याचे प्रमाण वाढत आहे. मानवी जीवनाला तंबाखू हानीकारक असल्याचे नागरिकांना पटवून द्या. शिवाय एडस् हा आजारही बरा न होणारा आहे. मात्र योग्य उपचार घेतले तर हा आजार आटोक्यात ठेवता येतो, याविषयी जनमानसात जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण समन्वय समिती, जिल्हा एडस प्रतिबंध व नियंत्रण समिती आणि स्त्रीभ्रूण हत्येला प्रतिबंध घालण्यासाठी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायद्यांतर्गत (पीसीपीएनडीटी) दक्षता पथक समितीच्या बैठकीत श्री. शंभरकर बोलत होते.

यावेळी श्री. शंभरकर यांनी तिन्ही समितीचा आढावा घेतला. बैठकीला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. बसवराज लोहारे, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. अनिरूध्द पिंपळे, निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी भगवान भुसारी यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते. जिल्ह्यात तंबाखू खाणाऱ्या नागरिकांना तंबाखूचे होणारे दुष्परिणाम, कॅन्सरसारखे आजार याची माहिती द्यावी. प्रत्येक शासकिय कार्यालयात कार्यालय प्रमुखांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना तंबाखू न खाण्याबाबत सूचना द्याव्यात. जिल्ह्यात एडस संसर्ग रूग्णांचे प्रमाण वाढू नये, यासाठी नियमित तपासण्या करा. रूग्णांवर योग्य उपचार करून औषधे कमी पडणार नाहीत, याकडे लक्ष द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

## देशमुखांच्या हस्ते आ. उमा खापरे यांचा सत्कार

सुराज्य/सोलापूर




विधान परिषद आमदार उमा खापरे यांचा आ. सुभाष देशमुख यांच्या संपर्क कार्यालयात भाजपा युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मनीष देशमुख यांनी सत्कार केला. योवळी भाजपा दक्षिण पश्चिम आणि दक्षिण पूर्व मंडलातील सोलापूर महिला मोर्चाच्या नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आला.

यावेळी आमदार खापरे उपस्थित भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांना मार्गदर्शन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा पधरवडा अंतर्गत मोदी यांच्या जीवनावर आधारित फोटो प्रदर्शनास देखील त्यांनी भेट दिली. यावेळी भाजपा सोलापूर शहर महिला मोर्चा अध्यक्ष इंदिरा कुडक्याल, शहर सरचिटणीस शशि थोरात, चिटणीस डॉ. शिवराज सरतापे, दक्षिण पश्चिम मंडल अध्यक्ष महेश देवकर, शिवशरण बब्बे, रोहिणी ताई तडवळकर, सोलापूर शहर भाजपा महिला मोर्चा चिटणीस संपदा जोशी, मंडल सरचीटणीस आनंद बिराजदार, सर्व नगरसेवक व नगरसेविका आणि सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## भाजलेल्या तरुणीचा उपचारादरम्यान मृत्यू

सुराज्य/सोलापूर : पावसात भिजल्यानंतर अंगावरील कपडे गॅसवर सुकविताना भाजून जखमी झालेली तरुणी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना आज शनिवारी सकाळी मरण पावली.




भाग्यश्री विक्रम ढवाण (वय २० रा. हुंडेगाव ता. परंडा जि. उस्मानाबाद) असे मयत झालेल्या तरुणीचे नाव आहे. ९ सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास ती पावसात भिजली होती. घरातील गॅसजवळ अंगावरील कपडे सुकवित असताना गाऊन पेटल्याने ती भाजली होती. तिला उस्मानाबाद येथे प्राथमिक उपचार करून २३ सप्टेंबर रोजी सोलापुरात दाखल करण्यात आले होते. अशी प्राथमिक नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## भाजीपाल्यांचे दर वाढले



कृषी उत्पन्न बाजार समितीकडून शनिवार, १ ऑक्टोबर रोजी मिळालेल्या माहितीनुसार भाजीपाल्यांच्या दरात वाढ झाली. यामध्ये वांगी, कोबी, ढोवळी मिरची, गाजर, कोथिंबीर, हिरवी मिरची, कांदा पात, लिंबू, मेथी भाजी, कांदा आदींच्या किंमती प्रतिक्विंटल २०० ते हजार रूपयेने महागल्या. तर काकडी, फ्लॉवर, चाकवत, तांदूळ, शेपू, पालक, टोमॅटो आदींच्या किंमती आज स्थिर राहिल्या.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ३,५०० | ६,००० | ५,००० |
| कारली | २,००० | ३,८०० | ३,००० |
| वांगी | २,००० | ३,००० | ५,००० |
| कोबी | ७०० | १,४०० | १,००० |
| ढोवळी मिरची | ७०० | २,५०० | १,५०० |
| गाजर | १,५०० | २,२०० | २,००० |
| गवार | ३,००० | ६,००० | ४,००० |
| कोथिंबीर | १,००० | २,५०० | १,५०० |
| काकडी | १,५०० | ६,५०० | ३,००० |
| फ्लॉवर | ९६० | १,७६० | १,१२० |
| लसूण | ९०० | २,६०० | १,५०० |
| घेवडा | ५,००० | ५,००० | ५,००० |
| हिरवी मिरची | २,५०० | ४,००० | ३,००० |
| अंबाडी भाजी | २०० | ५०० | ३०० |
| कांदा पात | १,००० | १,००० | १,००० |
| बटाटा | ७५० | २,१०० | १,८०० |
| राजगिरा | ७०० | ८०० | ७०० |
| लिंबू | २,००० | ५,२०० | ४,००० |
| तांदूळ | २,९८५ | ६,३०० | ३,७७० |
| दोडका | १,००० | ५,००० | ३,००० |
| शेपू | ६०० | १,२०० | १,००० |
| पालक | ६०० | १,००० | ७०० |
| टोमॅटो | २०० | २,२०० | ८०० |
| गहू | २,२९५ | ३,२३० | २,७३५ |

## गोष्ट एका ॲनिमल ॲम्बुलन्सची, जनावरांबरोबरच, माणसाला जीवदान देण्याची...

सुराज्य/माढा



मुक्या जनावरांवर उपचार करून त्यांचे प्राण वाचविण्यासाठी वेगाने निघालेल्या ॲनिमल ॲम्बुलन्ससमोर रस्त्यावर मोटार सायकल स्वार अपघात अवस्थेत पडलेला दिसला. ॲम्बुलन्समधील संवेदनशील पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या लक्षात घटनेचे गांभीर्य येताच, त्यांनी चालकाला गाडी थांबवण्यास भाग पाडून, जखमी व्यक्तीस त्या ॲम्बुलन्समध्ये घालून ग्रामीण रुग्णालयात पोहचत त्या व्यक्तीला जीवदान दिले.

त्याचे झाले असे की, मुख्यमंत्री पशुस्वास्थ योजनेंतर्गतचे माढा येथील फिरते पशू वैद्यकीय पथक मोबाईल व्हॅन घेऊन वडाचीवाडी येथे जात होते. याच दरम्यान माढा - कुर्डूवाडी रस्त्यावर वेताळवाडी येथे कुत्रा अडवून जाऊन माढा तहसील कार्यालयाकडील कर्मचारी चव्हाण यांचा गंभीर अपघात झाला होता. अपघातग्रस्त चव्हाण हे रस्त्यावर बेवारस स्थितीत पडलेले होते. रस्त्यावरील ये-जा करणारी वाहन त्यांना उपचारासाठी घेऊन जाण्यासाठी थांबत नव्हती. चव्हाण यांच्या मदतीला कोणी येत नव्हते.

या दरम्यान फिरत्या पथकाचे प्रमुख पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. बबनराव कांबळे यांनी वाहन चालक सोमनाथ चांगभले, तसेच सहाय्यक कर्मचारी जीवराज थोरात व जवळच्या वस्तीवरील नागरिकांच्या मदतीने अपघातग्रस्त व्यक्तीला ॲनिमल ॲम्बुलन्समध्ये बसवून माढा रुग्णालयात तातडीने पोहच केले. येथे चव्हाण यांच्यावर उपचार सुरु झाल्यानंतर डॉ. कांबळे हे जनावरांवरील उपचारासाठी वडाचीवाडी येथे गेले. डॉ. बबनराव कांबळे यांनी दाखवलेली मानवता तसेच संवेदनशीलता यामुळे अपघातग्रस्त चव्हाण यांचे प्राण वाचले.

डॉ. कांबळे, यांच्या या योगदानाबद्दल माढ्याच्या नगराध्यक्षा मिनल साठे, कुर्मदास साखर कारखान्याचे संचालक तथा नेते दादासाहेब साठे तसेच डॉ. कृष्णात भोसले, कृष्णा कॉलनीचे अध्यक्ष सुरेश चितारी, साई पॅराडाईज सोसायटीचे अध्यक्ष मंगेश डंके तसेच दोन्ही सोसायट्यांचे पदाधिकारी, सभासद, सुमेध पेट क्लिनीकच्या संचालिका डॉ. सोनिया कांबळे, डॉ. करण कांबळे तसेच या परिवाराच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.



## कमळाच्या दीड हजार फुलांनी केली दधीमातेची पूजा

सुराज्य/सोलापूर : नवरात्र उत्सवानिमित्त खास चेन्नईहून आणण्यात आलेल्या तब्बल दीड हजार कमळाच्या फुलांनी शुक्रवारी दधीमती मातेची पूजा करण्यात आली. श्री दाधीच समाज संस्थेतर्फे चाटी गल्ली येथील गायत्री भवन येथे हा सहस्त्र कमलपुष्प अर्चनेचा कार्यक्रम झाला.

गेल्या १८ वर्षांपासून दीड हजार कमळाच्या फुलांनी पूजा करण्याचा कार्यक्रम प्रत्येकवर्षी करण्यात येत आहे. यंदाचे १९ वे वर्ष आहे. शुक्रवारी गायत्री भवन येथे झालेल्या पूजेप्रसंगी श्री दाधीच समाज संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास दायमा, कार्याध्यक्ष गोविंद दायमा, उपाध्यक्ष भरतकुमार काकडा, कोषाध्यक्ष मनोजकुमार बोरायडा, मंत्री विजयकुमार दायमा, सोशल मीडिया प्रमुख आशिष दायमा, दाधीच सेवा व विकास संस्थेचे राज्य कोषाध्यक्ष विठ्ठल दायमा, पापाशेठ दायमा, कार्यकारणी सदस्य गोविंद व्यास, श्री दाधीच समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा मंगला बोरायडा, आदी उपस्थित होते. पुष्कर व्यास यांनी पौरोहित्य केले.

## तुळजाभवानी शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त वाहतूक मार्गात बदल

सुराज्य/सोलापूर

**७ ते १० ऑक्टोबरपर्यंत राहणार बदल**

**पोलीस अधीक्षक सातपुते यांचे आदेश**

कोजागिरी आणि मंदिर पौर्णिमा यानिमित्त तुळजापूरकडे पायी चालत जाणाऱ्या भाविकांची गर्दी होऊन कोंडी होण्याची शक्यता आहे. यामुळे ९ ऑक्टोबर २०२२ रोजी कोजागिरी पौर्णिमा व १० ऑक्टोबर रोजी मंदिर पोर्णिमा यादरम्यान वाहन चालकांसाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आल्याचे आदेश पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी दिले आहेत.

सोलापूर शहर, जिल्ह्यातील, कर्नाटक राज्यातील भाविक मोठ्या प्रमाणात तुळजापूरकडे पायी चालत जात असल्याने वाहतुकीची कोंडी होवू नये, भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचा अपघात होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये यासाठी भाविक पायी चालत जाणारे मार्गावरील वाहने अन्य मार्गाने



वळविण्यात येणार आहेत. भाविकांचे सुरक्षिततेच्या कारणावरुन खालीलप्रमाणे वाहतुक मार्गात बदल करण्यात आले आहेत. ७ ऑक्टोबर रोजीचे ते दिनांक १० ऑक्टोबर रोजीचे दरम्यान खालील मार्गावरून पथक्रमण करण्यास अत्यावश्यक सेवेची वाहने वगळून सर्व प्रकारच्या वाहनास मनाई करण्यात येत आहे. पोलीस, रुग्ण सेवा, अग्निशमन दलाचे वाहने व अत्यावश्यक सेवेतील वाहने तसेच एस. टी. बसेस या वाहनांना ही बंधने लागू राहणार नाहीत.

### असे असणार मार्ग


तुळजापूर ते सोलापूरकडे येणारी वाहतुक मंगरुळपाटी हटकल, बोरामणी मार्ग पथक्रमण करतील. सोलापूर ते तुळजापूरकडे जाणारी वाहतुक बोरामणी, इटकळ मंगरुळपाटी मार्ग पराक्रमण करतील. तुळजापूर ते बार्शीकडे येणारी वाहतुक तुळजापूर, उस्मानाबाद, पैराम, बार्शी मार्ग पथक्रमण करतील. बार्शी ते तुळजापूरकडे जाणारी वाहतुक बाशी, वैराग, उस्मानाबाद, तुळजापूर मार्ग पथक्रमण करतील.

तुळजापूर ते सोलापूरकडे येणाऱ्या वाहतुकिस पथक्रमण करण्यास तुळजापूर, तामलवाडी, सोलापूर या दरम्यान मनाई करण्यात आली आहे. सोलापूर ते तुळजापूरकडे जाणारी वाहतुकिस पथक्रमण करण्यास सोलापूर, तामलवाडी, तुळजापूर या दरम्यान मनाई करण्यात आली आहे. तुळजापूर ते बार्शीकडे येणारी वाहतुकिस पथक्रमण करण्यास तुळजापूर, ढेकरी, गौडगाव, बार्शी या दरम्यान मनाई करण्यात आली आहे. बार्शी ते तुळजापूरकडे जाणारी वाहतुकिस पथक्रमण करण्यास बार्शी, गौडगाव, ढेकरी, तुळजापूर या दरम्यान मनाई करण्यात आली आहे.

CMYK

# कमळेगुरुजी स्मारक भूमीपूजन सोहळा विशेष

## ‘सेवाव्रती’चा स्मृतिगंध...



– पुरुषोत्तम कुलकर्णी,
वृत्तसंपादक, दै. सुराज्य

जुन्या पिढीतील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते-गांधीवादी विचारसरणीचे सच्चे पाईक तथा राज्याचे माजी मंत्री स्व.दीनानाथ कमळेगुरूजी यांच्या स्मारक उभारणीच्या कामाचा भूमिपूजन सोहळा राष्ट्रपिता म.गांधी यांच्या जयंतीची दिनी रविवारी भंडारकवठे येथे होणार आहे. ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. हे स्मारक उभारण्यामागे काही कारणे आहेत. स्मारक कुणाचेही उभे राहात नाही. समाजातील सेवाव्रती, समाजकारणी व देशभक्त सैनिक यांची स्मारके उभी राहतात. स्मारक म्हणजे एकप्रकारे त्या व्यक्तीचा आदर्श प्रत्येक पिढीसमोर उभा करायचा असतो. त्या आदर्शातून एक जरी माणूस सेवाव्रती,समाजकारणी,उत्तम राजकारणी घडला तर अशी स्मारके सत्कारणी ठरत असतात. कमळेगुरूजी यांचे स्मारक उभारण्यामागे तोच उदात्त हेतू आहे. कमळेगुरूजी कोण होते, हे जुन्या पिढीला माहीत आहे पण आजची पिढी त्यापासून अनभिज्ञ आहे. स्वातंत्र्यानंतर देशात काँग्रेसचा दबदबा होता. भीमा नदीकाठी असलेल्या भंडारकवठे या गावचे ते सुपुत्र. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची. झोपडीत वास्तव्य. असा माणूस मंत्रीपदापर्यंत पोहचला. त्यांच्यातील ध्येयवाद, सेवाव्रत आणि शुद्ध आचरण या तीन तत्त्वांची जोपासना केल्याने थोरपणाच्या पायघड्या त्यांच्यापर्यंत चालून आल्या. स्वातंत्र्यानंतर देशात काँग्रेसचा दबदबा होता. सत्तर-ऐंशीच्या दशकात जिल्हा काँग्रेस कमिटीत एक ध्येयवादी व काँग्रेसनिष्ठ नेत्यांची जबरदस्त फळी होती. अंत्रोळीचे सुपुत्र डॉ.कृ. भि.अंत्रोळीकर यांनी नेत्यांची जी पिढी घडवली, त्यात कमळेगरूजींचा उल्लेख प्राधान्याने केला जातो. गांधीवादाच्या विचाराची कास धरून कमळेगुरूजींनी समाजकारणाचा वसा घेतला. सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाची स्थापना करून त्याद्वारे दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे, विंचूर, कंदलगाव, बरूर, औराद व मंद्रुप या सहा गावांमध्ये शिक्षण संस्था उभ्या केल्या. या तालुक्यातील गरीब, पिडीत व वंचित घटकातील मुले शिकली पाहिजेत. सुसंस्कारित व्हावीत या हेतूने त्यांनी ह्या शाळा सुरू केल्या. ज्या त्या गावातील मान्यवरांना सोबत घेऊन त्यांनी ही ज्ञानमंदिरे उभी केली. पांढरा शुभ्र नेहरू शर्ट, धोतर आणि खांद्यावर खादीचे उपरणे असा त्यांचा साधासुधा पेहराव असायचा. भाषण अभ्यासपूर्ण असायचे. वक्तृत्व अमोघ असायचे. विरोधकांवरचे भाषण मात्र आक्रमक असायचे. चारित्र्य आणि आचरण त्यांनी कसोशीने जपले. त्यामुळे काँग्रेसमध्ये त्यांची एक वेगळी ख्याती निर्माण झाली आणि त्यातूनच काँग्रेसने त्यांना १९८० मध्ये सोलापूर शहर दक्षिण विधानसभेची उमेदवारी दिली आणि ते निवडूनही आले.त्यावेळी बॅरिस्टर अब्दुल रहिमान अंतुले हे मुख्यमंत्री झाले.त्यांच्या मंत्रिमंडळात अन्न व नागरी पुरवठा मंत्रिपद कमळेगुरूजींना दिले गेले.एक सामान्य व्यक्ती मंत्री झाली याचे केवळ दक्षिण सोलापूरलाच नव्हेतर उभ्या जिल्ह्याला अप्रूप वाटले होते.

पुढे दोन वर्षात अंतुले सरकार कोसळल्यानंतर कमळेगुरूजींना राजकीय विजनवास सहन करावा लागला. तरी देखील त्यांनी आपली निष्ठा जपली.काँग्रेस पक्षात ते सदैव कार्यरत राहिले. नेहरूनगरच्या बसस्टॉपजवळ त्यांचे घर आहे. तेथून ते एसटीने गावाकडे येत असत. भंडारकवठेच्या बसस्थानकानजीक असलेल्या शाळेत थांबायचे. आपल्याला ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले, त्यांची ते सातत्याने भेट घ्यायचे. त्यामुळे गुरूजींचा जनसंपर्क कायम राहिला.शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याची ते आस्थेवाईक विचारपूस करत असत. त्याकाळी भंडारकवठेच्या पंचक्रोशीतील गावांमध्ये माध्यमिक शिक्षणाची सोय नव्हती. त्यामुळे परिसरातील विद्यार्थ्यांसाठी भंडारकवठे हेच सोयीचे गाव होते. बाहेरून येणाऱ्या गरीब मुलांसाठी त्यांनी जीवन विकास प्रशालेला लागून असलेल्या इमारतीत श्रीमहासिद्ध वसतिगृह सुरू केले. गुरूजींची वैचारिक बैठक होती. प्रबोधनात्मक कार्यक्रम ते नेहमी घेत असत. आरोग्य, शेती आणि शिक्षण हे त्यांच्या आवडीचे विषय. साने गुरूजी हे त्यांचे दैवत होते. साने गुरूजी कथामालेचे काम त्यांनी अनेक वर्षे केले. प्रत्येक शाळांमध्ये व्याख्यान व शिबिरे घेतली जात असत. त्यामुळे व्याख्याते व विचारवंतांचे पाय भंडारकवठे गावी लागत असे. कमळेगुरूजी आणि आमच्या घराण्यात असलेल्या जिव्हाळा कोण कोणत्या शब्दात म्हणून सांगायचा? माझे काका भीमराव कुलकर्णी (भीमरावदादा) आणि कमळेगुरूजी यांचा घनिष्ठ संबंध होता. काका हे काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. ते कमळेगुरूजींच्या प्रचार सभेत कायम असायचे. शाळेत येणाऱ्या पाहुण्यांचे जेवण काकांच्या घरीच असायचे. गुरुजनांचा घोळकाही असायचा. त्यामुळे कमळेगुरूजींचा पदस्पर्श आमच्या घरी कायम लागायचा.त्यामुळे मी लहानपणीच गुरूजींना पाहिले आहे.

### हा आदर्श जोपासला पाहिजे

मंत्रिपदानंतर गुरूजींना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाचा बहुमान मिळाला. त्या संधीचे त्यांनी सोने केले. त्यांच्याकडे वक्तशीरपणा होता. सकाळी काँग्रेस भवनमध्ये ते येऊन बसायचे. दिवसभर कार्यकर्त्यांची कामे करायची. तालुका कमिट्यांना ते कार्यक्रम देत असत.तालुकास्तरावर ते शिबिरे घेत असत. त्यामाध्यमातून कार्यकर्त्यांमध्ये गांधीवाद व काँग्रेसची विचारसरणी ते रूजवायचे.पत्रकारितेच्या माध्यमातून मला गुरूजींना जवळून अनुभवता आले. रोज बातम्यांसाठी काँग्रेस भवनला व्हिजिट असायची. तिथे मनमुराद गप्पा असायच्या. तालुक्याच्या शिबिरांसाठी ते पत्रकारांना आवर्जून नेत असत. एकदा उजनीच्या रेस्टहाऊसला शिबिर होते.त्यांनी मला तिथे घेऊन गेले होते. गांधी विचारसरणीवर त्यांचे भाषण ऐकून सारे पत्रकार बांधव धन्यधन्य झाले. अशा शिबिरांच्या माध्यमातून उभ्या जिल्ह्यात सर्वमान्य नेता म्हणून गुरूजींची विशेष ओळख झाली होती. त्यांच्याकडे राजकीय कौशल्य होते. समोरचा आडवा आला तर तेही शहकाटशहचा मार्ग अनुसरायचे. झेडपीमध्ये कॅबिनेट पदे मिळवण्यात माळशिरस,मोहोळ,पंढरपूर आणि मोहोळ या तालुक्यांचीच मक्तेदारी असायची. गुरूजींनी ही पद्धतच मोडून काढली. त्यासाठी त्यांना पक्षांतर्गत संघर्ष करावा लागला.पण ते डगमगले नाही.त्यांच्या रेट्यामुळे दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर आणि अक्कलकोट या तालुक्यांना कॅबिनेटची पदे मिळू लागली. हे सत्य कुणालाच नाकारता येणार नाही. आजच्या काँग्रेसमध्ये प्रबोधनात्मक शिबिरे होत नाहीत.काँग्रेस भवनची इमारत असतानाही जनता दरबार भरवला जात नाही. त्याचा आजच्या नेत्यांना विचार करावा लागणार आहे.

### स्मारक नव्हे तर दीपस्तंभ

जन्मगावीच गुरूजींच्या कार्याचे स्मारक उभे राहात आहे. याचा भंडारकवठे ग्रामस्थांना विशेष आनंद वाटत आहे. गुरूजी हे पुरोगामी विचाराचे होते पण त्यांनी कुठल्याही धर्माचा अनादर केला नाही. जातिवाद केला नाही. जिथे शिक्षण संस्था उभ्या केल्या,तिथे समाजातील सगळ्या घटकांना सामावून घेतले. आज या ज्ञान मंदिरातून अनेकांचे संसार उभे राहिले. इथे शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी मोठ्या हुद्यांवर गेले आहेत. गुरूजींच्या संस्थेत शिक्षण घेणारा विद्यार्थी हा सुंस्कारित असतो,असा आदर्श या तालुक्यात सांगितला जातो. शिक्षकही तितक्याच तोडीचे होते व आजही आहेत. गुरूजींनी केवळ संस्था उभ्या केल्या नाहीत तर गुणवत्तेवर त्यांचा कटाक्ष असायचा.त्यांचे उभे राहाणारे हे स्मारक हे स्मृतिगंध असेलच पण प्रत्येक पिढीसाठी ते दीपस्तंभ ठरेल, यात शंकाच नाही.

## स्व-आचरणातून समाज घडविणारे शिक्षक



– विजय बिज्जरगी,
भंडारकवठे

भंडारकवठे सारख्या ग्रामीण भागात अत्यंत गरीब कुटुंबात जन्म घेऊन जिथे दारिद्र्यच पाचवीला पुजलेला होता, अशा अवस्थेत बाबासाहेब म्हणतात, ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’, या त्रिसूत्रीचा जीवनभर ज्यांनी आचरण करुन शिक्षणाशिवाय नाही समृद्धी या सुंदर विचाराची कास मनी धरुन अत्यंत खडतर परिस्थितीत शिक्षण घेऊन समाज घडविण्याचे स्वप्न उराशी बाळगून शिक्षक म्हणून सेवा स्वीकारली,ते कमळेगुरूजींनी. पुढे म. गांधीजींच्या प्रभावामुळे शिक्षक म्हणून नोकरी न करता नोकरीचा राजीनामा देऊन पूर्ण वेळ काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून स्वच्छता, स्वदेशी, स्वातंत्र्य अशा गांधीजींच्या विविध अभियानात सहभागी होऊन स्वआचरणातून समाज घडविणारे समाजशिक्षक म्हणून त्यांनी कार्य केले. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असताना गुरुजी नोकरी सोडून समाजसेवेचे व्रत स्वीकारतानाचा प्रसंग नेहमी सांगत. त्यांची आई बालपणीच निवर्तल्या. वृद्ध पिता शिरेप्पा कमळे त्यांना म्हणाले, अरे तिप्पण्णा, मला अफूची गोळी आणून घाल आणि ही नोकरी सोडून समाजसेवेचे कार्य कर. परिस्थिती हलाखीची असताना हातातील नोकरी सोडणे म्हणजे सुखाला लाथ मारणे होय. सुखाला तिलांजली देऊन समाजसेवा करणारे कमळे गुरुजी हे खऱ्या अर्थाने समाजशिक्षक होत. सामान्य कुटुंबात जन्म घेऊन असामान्य काम करणारे गुरुजी होते. गांधीजी म्हणतात, त्याप्रमाणे ते समाजातल्या शेवटच्या माणसांसाठी सातत्याने काम करीत. दीन-दलित, पददलित समाजासाठी ते सतत झटत. दीनांचा बंधू म्हणून ते कार्य करीत. म्हणून तिप्पण्णा हे त्यांचे मूळ नाव पण, दीनबंधू कमळे गुरुजी हे नाव त्याच्या कार्यामुळे त्यांना समाजाकडून मिळाले. म. फुलेंच्या या विचाराविना तरणोपाय नाही. अविद्येचा अंध:कार सरुन तिमिरातूनच तेजाकडे समाजाला नेले पाहिजे. म्हणून द. सोलापूर तालुक्यातील सीना-भीमा खोऱ्यांमध्ये शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून गावो-गावी शाळा काढून ज्ञानदानाचे महान कार्य केले. शेती, शिक्षण आणि आरोग्य हा त्रिसूत्री कार्यक्रम खेड्यांपाड्यांपर्यंत जाऊन शाश्वत शेती कशी असावी, ऋषीकृती अशी असावी यासाठी विनोबा भावेंचे परमशिष्य गंगाप्रसाद अग्रवाल यांना आणून सेंद्रीय खत कमी खर्चात, कमीत कमी वेळेत कसे निर्माण करावे, यांचे प्रात्यक्षिके व प्रबोधनपर व्याख्याने आयोजित करुन स्वत:च्या शेतात त्यांचे प्रयोग करुन सांगणारे गुरुजी होते. गुरुजी स्वत: ग्रामसफाई करीत आणि शिक्षकांच्या शिबिरात स्वत: हातात झाडू घेऊन स्वच्छता करीत आणि शिक्षकांनाही करायला लावीत. गुरुजी सरस्वतीचे पुजारी तर होतेच होते तसेच ते स्वच्छतेचे पुजारीही होते.

कमळे गुरुजी म्हणजे कर्मयोगी होते. समाजाविषयी अत्यंत उत्कट प्रेम त्यांच्यात होते. समता, समाजवाद, मानवता ही मूल्ये जपणारे गुरुजी होते. साने गुरुजी म्हणतात तसे जगाला प्रेम अर्पण करणारे गुरुजी होते. गुरुजींच्या होणाऱ्या या स्मारकातून नवी पिढी प्रेरणा घेईल व गुरुजींचे कार्य पुढे नेतील, अशी आशा करतो आणि कमळे गुरुजींच्या स्मृतींना त्रिवार वंदन करतो.



## मैंदर्गी जि.प. प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळेस पुरस्कार

सुराज्य/अक्कलकोट : छत्रपती परिवाराच्या वतीने देण्यात येणारा पुरस्कार यंदा मैंदर्गी जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळेला देण्यात आला. माजी शिक्षण संचालक दिनकर पाटील यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य अध्यक्ष उदय शिंदे होते. छत्रपती परिवाराच्या वतीने जिल्ह्यातील २१ शिक्षकाचा तर प्रत्येकी ११ शाळेचा स्वच्छ व सुंदर शाळा तसेच वृक्षमित्र शाळा पुरस्कारांनी गौरविण्यात आले. याप्रसंगी शिक्षणाधिकारी डॉ. किरण लोहार, माजी शिक्षण उपसंचालक प्रदीप मोरे, जुनी पेन्शन संघटनेचे राज्याध्यक्ष वितेश खांडेकर, प्राथमिक शिक्षक भारतीचे राज्याध्यक्ष नवनाथ गेंड, मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे अध्यक्ष श्यामराव जवंजाळ, अनिल कादे, शिवशंकर भांजे, प्राध्यापक वनमाला भगरे आदींची यावेळी उपस्थिती होती. याप्रसंगी मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी, गुरुनाथ शिवणगी, रमेश जुजगार, सुरेखा मसुती, गीता शिवणगी, विजया नाडगौडा, विजयालक्ष्मी भैरामडगी, सुप्रिया बिराजदार, सीमा हिरतोट आदी उपस्थित होते. प्रास्ताविक छत्रपती परिवाराचे संस्थापक सुरेश पवार यांनी केले तर सूत्रसंचालन सुहास उरवणे यांनी तर आभार संभाजीराव पवार यांनी मांडले.

## सातलिंगप्पा म्हेत्रे पुण्यतिथीनिमीत्त दुधनीत आज कार्यक्रम



सुराज्य/अक्कलकोट : दुधनीचे दिवंगत नगराध्यक्ष स्व. सातलिंगप्पा म्हेत्रे यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमीत्त म्हेत्रे मळा, दुधनी ता. अक्कलकोट येथे सामाजिक बांधिलकीतुन रविवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मार्केट कमिटीचे सभापती प्रथमेश म्हेत्रे यांनी दिली. यावर्षी अक्कलकोट तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी, जनावरांमध्ये पसरलेला लंपी आजारामुळे कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता स्व. सातलिंगप्पा म्हेत्रे यांची पुण्यतिथी साजरी करणार असल्याची माहिती सभापती प्रथमेश म्हेत्रे यांनी दिली. रविवार दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता दुधनी येथे सकाळी पशुधनासाठी लंपी लसीकरण, कोरोना लसीकरण मोहीम राबविण्यात येणार असून याचे उद्घाटन म. नि. प्र. डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामी (विरक्त मठ, दुधनी) यांच्या हस्ते होणार आहे या शिबिराचा पशुपालक व जनतेने लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी सभापती शंकर म्हेत्रे, महिला अध्यक्ष शीतल म्हेत्रे, सुभाष परमशेट्टी, रामा गद्दी, गुरू हबशी, विश्वनाथ हडलगी, अशोक धोनी, सचिव एस. एस. स्वामी, डॉ. उदय म्हेत्रे, संगम म्हेत्रे, शशिकांत सावळसुर, राजु म्हेत्रे आदी उपस्थित होते.

## आवाटी सबस्टेशनला २ कोटी ३७ लाख निधी मंजूर : संजयमामा शिंदे

सुराज्य/कुर्डूवाडी



गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला कोळगाव धरण परिसरातील विजेचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार असून आवाटी सबस्टेशन ६ महिन्यात कार्यान्वित होईल व या परिसरातील शेतकऱ्यांना त्याचा शाश्वत फायदा होईल अशी माहिती करमाळा मतदार संघाचे आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली.

याविषयी अधिक माहिती देताना ते म्हणाले की, गेल्या २ वर्षापासून कोळगाव धरण १००% भरत असल्यामुळे या परिसरातील गावामध्ये मोठ्या प्रमाणावरती ऊस, केळी आदी बारमाही पिकांची लागवड झालेली आहे. असे असूनही सबस्टेशन वरती अतिरिक्त लोड असल्यामुळे पुरेशा दाबाने वीज पुरवठा होत नव्हता. त्यामुळे या परिसरातील नागरिकांची नवीन सबस्टेशनची मागणी अनेक दिवसापासून सुरू होती. या मागणीला मूर्तस्वरूप प्राप्त झाले असून आवाटी येथे नवीन सबस्टेशन उभारणी साठी दोन कोटी ३७ लाख रुपये निधीची तरतूद झालेली असून या कामाचा कार्यारंभ आदेश २८ सप्टेंबर २०२२ रोजी निघालेला आहे धरण उशाला असूनही कमी दाबाने मिळणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे येथील नागरिकांच्या घशाला मात्र कोरड होती.

अपुऱ्या दाबाने व प्रत्यक्षात ४ तासच या भागात वीज पुरवठा केला जात होता. परंतु आता नवीन सबस्टेशन मुळे हा प्रश्न निकाली निघणार आहे. पूर्वीच्या कोळगाव सबस्टेशन वरती गौंडरे, आवाटी, नेरले, निमगाव ह, हिवरे, कोळगाव धरण असा लोड होता. आता नवीन सबस्टेशन झाल्यामुळे कोळगाव सबस्टेशनवरील लोड कमी होणार आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना पुरेशा दाबाने ८ तास वीज पुरवठा सुरळीतपणे सुरू होईल. नव्याने उभारण्यात येणाऱ्या आवाटी सबस्टेशनवर कोळगाव धरणासह गौंडरे, आवाटी व नेरले या गावांना वीज पुरवठा केला जाणार आहे.

## हृदयविकारांमुळे जगात दरवर्षी दोन कोटी लोक मृत्युमुखी : डॉ. जावळी

सुराज्य/बार्शी : जगात प्रतिवर्षी जवळपास दोन कोट लाख लोक हृदयविकारामुळे मृत्युमुखी पडतात. भारतातही हे प्रमाण वाढत असून बार्शी सारख्या ग्रामीण भागात होत असलेली कॅथलॅबची उभारणी कौतूकास्पद आहे असे गौरवोद्गार जगद विख्यात हृदयशल्य चिकित्सक डॉ. विवेक जावळी यांनी काढले.

शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटलच्या ट्रॉमा युनिट अंतर्गत कॅथलॅबची व हृदयरोग चिकित्सा विभागाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार राजेंद्र राऊत अध्यक्षस्थानी होते. यावेळी माजी नगराध्यक्ष ॲड. असिफभाई तांबोळी, संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. यादव यांनी या युनिटचे अंदाजपत्रक ४० कोटींपयरत गेले आहे. ९०% काम पूर्ण झाले आहे. संस्थेच्या सर्व सेवकांनी १ महिन्याचा पगार म्हणजे ५ कोटी २६ लाख रूपये या युनिटसाठी दिल्याचे सांगितले. आ. राऊत यांनी गोरगरिबांच्या सेवेसाठी हे हॉस्पिटल उपयोगी ठरावे हे कर्मवीरांचे स्वप्न साकार होत असून यापुढेही या कामाला मदत करणार असल्याचे सांगितले. यावेळी जयकुमार शितोळे, डॉ. जगताप, पी. टी. पाटील यांनीही मनोगते व्यक्त केले. यावेळी रमेश पाटील, शिवाजी कांबळे, डॉ. जावळी यांच्या पत्नी साधना जावळी, आई स्नहेलता जावळी आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन माधुरी शिंदे व प्रा. किरण गाढवे यांनी केले. आभार अरूण देबडवार यांनी मानले.

## महिलांनी प्रत्येक क्षेत्रात ठसा उमटविला : शितलदेवी

सुराज्य/अकलूज



आज प्रत्येक क्षेत्रात महिला आपल्या कर्तुत्वाने उतुंग भरारी घेताना दिसत आहेत. आपल्या कला गुणांना वाव देत प्रत्येक क्षेत्र महिलांनी काबीज केले आहे असे मत डॉटर्स मॉम फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा शिवरत्न शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा शितलदेवी मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

पोलीस प्रशासनास प्रशासकीय कामात नेहमीच सहकार्य व मदत करणा-या महिलांचा अकलूज पोलीस स्टेशनच्या वतीने दुर्गाशक्ती सन्मान व सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. डॉटर्स मॉम फाउंडेशनच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते पाटील व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपूजे यांचे उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला, याप्रसंगी मार्गदर्शन करताना शितलदेवी बोलत होत्या. कार्यक्रमास पोलीस निरीक्षक अरुण सुगांवकर, डॉ. कदम मॅडम, डॉ. मिसाळ मॅडम, फातीमा पाटावाला, महिला संरक्षण अधिकारी वावरे मॅडम, डॉ. देवडीकर मॅडम, प्रा. जयश्री धुमाळ, माजी सरपंच पायल मोरे, छाया बुराडे, डॉ. श्रध्दा जवंजाळ, सविता व्होरा महिला पोलीस अंमलदार सिमा सोनवणे, नाजनीन तांबोळी, वैष्णवी बाबर, अनुराधा अडगळे या उपस्थितीत होत्या. पोलीस उपनिरीक्षक बबन साळुंके यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व महिला पोलीस उपनिरीक्षक स्वाती कांबळे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. कार्यक्रमास पोलीस अंमलदार रामचंद्र चौधरी, सुहास क्षिरसागर, मनोज शिंदे हे उपस्थित होते.

## पंढरपूर तालुक्यात फिरती लोक अदालत

सुराज्य/पंढरपूर

ग्रामीण भागातील जनसामान्यांना तसेच समाजातील तळागाळातील नागरिकांना न्याय मिळावा. याकरिता मुंबई उच्च न्यायालय विधी सेवा समितीच्या आदेशान्वये पंढरपूर तालुका विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने तालुक्यात न्याय आपल्या दारी’ या संकल्पनेतंर्गत मोबाईल व्हॅनमधून फिरते लोक अदालत गावागावांत पोहोचणार असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांनी दिली.

न्याय आपल्या दारी’ या संकल्पनेतंर्गत फिरते



लोकअदालतीसाठी महाराष्ट्र राज्य विधीसेवा प्राधिकरण मुंबई, येथून आलेल्या मोबाईल व्हॅनचे उद्घाटन तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी तदर्थ जिल्हा न्यायाधीश बी. बी. तोष्णीवाल, न्यायाधीश एम. आर. जाधव, न्यायाधीश ए. ए. खंडाळे, न्यायाधीश श्रीमती टी. जी. बन्सोड, न्यायाधीश एम. आर. कामत, न्यायाधीश श्रीमती आर. जी. कुंभार, न्यायाधीश श्रीमती एस. ए. साळुंखे उपस्थित होते.

फिरते लोक आदालत हे दि. ३० सप्टेंबर ते ०३ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत तालुक्यातील भाळवणी, करकंब व तुंगत येथील ग्रामपंचायत येथे जावून न्यायालयात प्रलंबित असलेले दिवाणी व फौजदारी प्रकरणे तसेच बॅकांचे, विद्युत महामंडळाचे, इतर दाखलपुर्व प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीने निकाली काढण्यात येणार असल्याचेही जिल्हा न्यायाधीश लंबे यांनी सांगितले. संबधित ग्रामपंचायतीतील जास्ती-जास्त नागरिकांना या फिरत्या लोकअदालतीचा लाभ घ्यावा असे आवाहनही जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांनी यावेळी केले आहे. यावेळी पॅनल विधीज्ञ ॲड. श्री व्ही. एम. सरवळे, ॲड. श्री. एस. ए. गोसावी, विधी स्वयंसेवक श्री. आझाद अल्लापूरकर, श्री. मथुरादास देशपांडे, ॲड. श्री. वाघमोडे, श्री. आर. एस. बेंबळकर, अधिक्षक व न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

## स्वेरीच्या ऋतुजा जाधवची वोडाफोन कंपनीत निवड

सुराज्य/पंढरपूर : पुणे येथील वोडाफोन इंडिया सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमीटेड’ या पनीने घेतलेल्या निवड प्रक्रियेतून गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील ऋतुजा राजेश जाधव या विद्यार्थीनींची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे. ’ अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

वोडाफोन इंडिया सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमीटेड’ या बहुराष्ट्रीय कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी निवड प्रक्रिया राबविली. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या ऋतुजा राजेश जाधव यांची निवड केली. सदर विद्यार्थीनीला वार्षिक रु. ४. ७५ लाख एवढे पॅकेज मिळाले आहे.

# विद्यापीठ विकास मंचचे ५, सुटाचे ३ तर वालचंदचा १ उमेदवार विजयी

✔ सुराज्य/सोलापूर

**शहर-जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या सोलापूर विद्यापीठ सिनेट पदवीधर मतदारसंघाचा निकाल अखेर जाहीर झाला आहे. पदवीधरच्या १० जागांसाठी निवडणूक झाली. यामध्ये शुक्रवारी रात्रभर मतमोजणी केल्यानंतर शनिवारी सकाळी साडेसात वाजता निकाल जाहीर करण्यात आला. ज्यामध्ये विद्यापीठ विकास मंचचे ५, सुटाचे ३ तर वालचंद शिक्षण समूहाचा एक उमेदवार विजयी झाला. तर राजाभाऊ सरवदे बिनविरोध निवडून आले होते.**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ पदवीधर निवडणुकीचे मतदान २९ सप्टेंबर रोजी पार पडले. शुक्रवारी, ३० सप्टेंबर रोजी रात्री १० वाजता मतमोजणीस सुरुवात झाली तर १ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेसात वाजता मतमोजणी पूर्ण झाली. या निवडणुकीत अत्यंत चुरशीने मतदान झाल्याचे दिसून आले.

सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष व सुटा संघटनेचे उमेदवार गणेश डोंगरे यांनी सर्वाधिक मते घेत विजय संपादन केला. विद्यापीठ स्थापन झाल्यापासून प्रथमच काँग्रेसचे डोंगरे हे विजयी झाले आहेत. त्यांना सर्वाधिक ७२४ मते पडली.

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, प्रदेश अध्यक्ष नाना पटोले, आमदार प्रणिता शिंदे, प्रदेश युवक काँग्रेस अध्यक्ष कुणाल राऊत, काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश वाले यांनी त्यांच्या विजयाबद्दल सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच यावेळी काँग्रेस भवन येथेही जल्लोष करण्यात आला.

### पदवीधरमधून विजयी व पराभूत उमेदवार व त्यांची मते

- सिनेट - पदवीधर महिला (एक जागा) : कामुर्ती वर्षाराणी गिरीष - १ हजार ३६४ मते (विजयी), तर सपाटे मंजुळा मनोहर - १ हजार ३२९ मते (पराभूत), शिंदे राजश्री विजय - १ हजार १६२ मते (पराभूत).

- सिनेट - पदवीधर डीटीएनटी (एक जागा) : होनमाने यतिराज चंद्रकांत - १ हजार ४२७ मते (विजयी), चौगुले शंकर सोमन्ना - १ हजार ३२७ मते (पराभूत), पाटील प्रशांत विष्णुपद - १ हजार १०२ मते (पराभूत).

- सिनेट - पदवीधर ओपन (५ जागा) : डोंगरे गणेश - ७२४ मते, बंकुर चन्नबसप्पा - ६५४ मते, देशमुख अजिंक्य - ५६३ मते, संगवे अजितकुमार - ६६७ मते, गायकवाड सचिन - ६१४ मते हे ५ उमेदवार पदवीधर ओपन मधून विजयी झाले. तर दिड्डी राजेश - १४ मते, गायकवाड प्रवीण - २३१ मते, गवळी विजय - २ मते, गुंड दीपक - १८५ मते, इंगळे केशव - ३३ मते, कस्तुरे जीवराज - ११७ मते, खुळे सचिन - १७८ मते, महाडिक तेजस्विनी - ०७ मते, मोरे गणपत - २७१ मते, मुळे संजय - १५ मते, नागणे सुनील - ८ मते, पाटील आनंद - ११, पवार गणेश - ४०५ मते, पिस्के संदीप - १९७ मते आणि शेख एजाज - ४२६ मते घेत हे सर्व उमेदवार पराभूत झाले.

- पदवीधर ओबीसी (एक जागा): मंकणी नीता सुरेशबाबू - १ हजार ८९१ मते (विजयी) तर बिजापुरे सिराज अहमद चांदसाहब-१ हजार ४०६ मते घेत पराभूत झाले.

- पदवीधर एसटी (एक जागा) : पवार उषा नंदकुमार - १ हजार ७३२ मते (विजयी) तर भोसले दिनेश संभाजी - १ हजार ५९५ मते (पराभूत).



## भानवसे यांच्या हस्ते दुर्गा मातेचे पूजन

✔ **सुराज्य/वेळापूर :** वेळापूर तालुका माळशिरस येथील माळी गल्ली येथे नवरात्र महोत्सवनिमित्त दुर्गा देवीचे राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा महिला उपाध्यक्षा अश्विनी भानवसे व उमेश भानवसे यांच्या हस्ते पूजा करण्यात आली.

यावेळी संस्थापक अध्यक्ष आनंदराव वाघे व दुर्गादेवी वाघे, शंभू वाघे, संदेश राऊत, सोमनाथ आडत, गणेश राऊत, सुरज उरणे, आकाश उरणे, अमोल मंडलिक ,चींकू साखरे, अमोल महाराज, शिवाजी जाधव, सानिया शेख, आलिशा शेख, नागेश क्षीरसागर, हरी क्षीरसागर आदी उपस्थित होते.

## अपहार केल्याप्रकरणी संस्थाध्यक्षास अटकपूर्व जामीन

✔ **सुराज्य/दक्षिण सोलापूर :** संस्थेतील सहकाऱ्यांशी संगनमत करून संस्था सभासदांनी पीक कर्जाच्या परतफेडपोटी भरलेली मुद्दल व व्याजाच्या रकमेचा अपहार केल्याप्रकरणातून बी. डी. पाटील (वय - ७२, रा. येळेगाव, कंदलगाव, द.सोलापूर) यांना जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती. आर.एन. पांढरे सो यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला.

पाटील हे येळेगाव विविध कार्य. सेवा सहकारी संस्था मर्या. येळेगाव या संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष होते. संस्थेचे तत्कालीन सचिव, बँक इन्स्पेक्टर व अध्यक्षांनी संगनमत करून संस्थेच्या सभासदांनी पीक कर्जाच्या परतफेडपोटी जमा केलेली मुद्दल व व्याजाची रक्कम याचा भरणा संबंधित सभासदाच्या खात्यात न भरता १३ लाख ४१ हजार १५३ रुपयांचा अपहार केला, अशा आशयाची फिर्याद लेखाधिकारी इराप्पा राचप्पा यांगटे यांनी मंद्रूप पोलिसात दिली होती. त्याप्रमाणे सदर संस्थेचे अध्यक्ष, सचिव व बँक शाखा निरीक्षक यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पाटील यांनी ॲड. प्रशांत नवगिरे यांच्यामार्फत अटकपूर्व जामीन मिळण्याकरिता मा. न्यायालयात अर्ज दाखल केला. युक्तिवाद ऐकून व ग्राह्य धरून मा. कोर्टाने संस्थेचे अध्यक्ष बी. डी. पाटील यांचा अटकपूर्व मंजूर केला. आरोपीतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. श्रीपाद देशक तर सरकार तर्फे ॲड. दत्तुसिंग पवार यांनी काम पाहिले.

## संतोषी मोरे यांचे निधन



✔ **सुराज्य/अक्कलकोट :** अक्कलकोट पंचायत समितीचे माजी विरोधी पक्ष नेते तथा फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे संचालक बाळासाहेब मोरे यांच्या पत्नी संतोषी बाळासाहेब मोरे (वय- वर्षे ४२) यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, एक मुलगी असा परिवार आहे. शनिवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## रणजित बोधले यांचे निधन



✔ **सुराज्य/अक्कलकोट:** मळोली (ता. माळशिरस) येथील रणजित विठ्ठल बोधले यांचे वयाच्या ५० व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा व दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# श्रीनाथ विद्यालयास २५ लाखांची लॅब मंजूर

✔ सुराज्य/श्रीपूर

**बोरगांव येथील श्रीनाथ विद्यालय व कै. विजयकुमार ऊर्फ बाबासाहेब शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालयास शासनाची अद्ययावत लॅबोरेटरी साठी अटल योजनेतून २५ लाख रु. मंजूर झाले असून लॅब उभारणीस लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती स्थानिक सल्लागार समिती चेअरमन व भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य राजकुमार पाटील यांनी दिली.**




विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रथम कर्मवीर भाऊराव पाटील यांचे प्रतिमेचे पूजन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ॲड. गणेश राजूबापू पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा व माजी प. स. सदस्या कुमुदिनी राजकुमार पाटील, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी अशोक पवार यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच ज्योतीराम आवताडे फळवणी, सदस्य डॉ. रमेश बिडवे, प्राचार्य के. टी. कांबळे, पृथ्वीराज पाटील, मिरे सोसायटीचे चेअरमन विजय गुंड पाटील, माजी विद्यार्थी जयदीप यादव, माजी मुख्याध्यापक बाळासाहेब गायकवाड, माजी उपमुख्याध्यापक बाळासाहेब मगर, ज्येष्ठ शिक्षक विकास नलवडे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात ज्येष्ठ शिक्षक नलवडे यांनी केले. यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे ॲड. गणेश राजा बापू पाटील, अशोक पवार, ज्योतीराम अवताडे, राजकुमार पाटील, कुमुदिनी पाटील, डॉ. रमेश बिडवे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

यावेळी पाटील म्हणाले की, '१९६७ साली कै. रावसाहेब पाटील यांनी ही संस्था चालू केली. पुढे या संस्थेची भरभराट कै. विजयकुमार ऊर्फ बाबासाहेब पाटील यांच्या कष्टामुळे झाली. शिस्त, दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहे. परंतु सध्या शाळे पुढे मूलभूत समस्या आहेत त्यात अर्थकारण महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपणास फंड निर्माण करावा लागणार आहे. यातून गरीब विद्यार्थ्यांना मदत केली जाणार आहे.'

याप्रसंगी ॲड. गणेश राजूबापू पाटील यांनी ही ग्रामीण भागातील संस्था असूनही राजकुमार पाटील यांच्या घराण्याने ह्या संस्थेवर जिवापाड प्रेम करत संस्था नावारूपाला आणल्याचे सांगितले. तसेच यावेळी अशोक पवार, सौ. अश्विनी पाटील, पालक सचिन गुळमकर आदींनी विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन शिक्षिका सोनाली पाटील यांनी केले तर आभार श्रीनिवास गज्जम यांनी मानले.

## लाकडी काठ्यांनी मारहाण; सहा जणांवर गुन्हा

✔ **सुराज्य/सोलापूर :** किरकोळ कारणावरून लाकडी काठ्यांनी मारहाण करून जखमी केल्याची घटना दि.२९ सप्टेंबर रोजी रात्री नऊ ते साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान हब्बू वस्ती देगाव येथे घडली.

याप्रकरणी सुनीता माळप्पा बिरूणगी (वय-३८, रा. हब्बू वस्ती, देगाव) यांनी फौजदार चवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून बाळाबाई आखाडे, भीमराव उर्फ भावेश कैलास क्षीरसागर व त्यांचे तीन साथीदार (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी व फिर्यादीच्या घरातील सर्व मंडळी घरामध्ये बसले होते. त्यावेळी बाळाबाई आखाडे या घरी येऊन फिर्यादी यांचा मुलगा विजय यास म्हणाल्या की, 'तू माझ्या भावजयसोबत राहून माझ्या भावाचा संसार उद्ध्वस्त केला म्हणून फिर्यादीच्या मुलाला शिवीगाळ करून मारण्यासाठी अंगावर धावून गेल्या. त्यानंतर फिर्यादी यांचा मोठा मुलगा हा भीतीने घरात निघून गेला. तसेच रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास भीमराव उर्फ भावेश कैलास क्षीरसागर हा त्यांच्या इतर नातेवाईकांसह हातामध्ये लाकडी काठी घेऊन घरातील वस्तूंची तोडफोड करून फिर्यादी यांच्या घरातील मंडळींना मारहाण केली, असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक मुलाणी हे करीत आहेत.

## मंदिराजवळून दुचाकी पळवली

✔ **सुराज्य/सोलापूर :** अज्ञात चोरट्याने रूपा भवानी मंदिर येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.बीके.७३९४ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.याप्रकरणी अय्याजफैज अहमद सय्यद (वय-३२,रा. कुर्बान हुसेन नगर, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक गायकवाड हे करीत आहेत.

# महापालिका परिवहन उपक्रम कार्यालय अधीक्षक श्रीशैल लिगाडे बडतर्फ

## ८.२४ लाख नुकसान वसूल करण्याचीही नोटीस

✔ सुराज्य/सोलापूर

**महापालिका परिवहन उपक्रमातील कार्यालय अधीक्षक आणि लेखापाल श्रीशैल दत्तात्रय लिगाडे यांना अखेर परिवहन व्यवस्थापक तथा महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी सेवेतून बडतर्फ करण्याची कारवाई केली आहे. आणखी इतर प्रकरणेही उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या कारवाईमुळे कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.**

महापालिका परिवहन उपक्रमातील विविध पदावर दिशाभूल करून राहिलेले श्रीशैल लिगाडे यांना एका प्रकरणात त्यांच्या विभागातील मूळ पदावर व त्यांच्या मूळ वेतनावर आणण्याबरोबरच त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

यानंतर आता दुसऱ्या प्रकरणात त्यांच्यावरील दोष सिद्ध झाल्याने त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांनी काढले आहेत. त्यांच्या विरोधातील प्रकरणाच्या चौकशी अंती त्यांनी परिवहन उपक्रमाचे १८ लाख २४ हजार २४० रुपयांच्या नुकसानीची वसुली करण्यासाठी नोटीस आणि या प्रकरणात कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

**इतर प्रकरणेही उघडकीस येण्याची शक्यता**

लिगाडे यांच्याकडे परिवहन विभागाच्या कार्यालय अधीक्षक तथा लेखापाल या पदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. स्थानिक निधी लेखा परीक्षणासाठी आवश्यक ते सर्व रेकॉर्ड पथक प्रमुखांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी त्यांची होती मात्र तसे झाले नाही. यासाठी त्यांनी डेबोकच्या नोंदी घेतल्या आहेत परंतु शिल्लक रकमेचा ताळमेळ त्यांनी जुळवून घेतलेला नाही.



या प्रकरणात त्यांची चौकशी होऊन २७ एप्रिल रोजी त्यांना निलंबित करण्यात आले होते. यानंतर दुसऱ्या प्रकरणात ते दोषी आढळल्याने त्यांना देण्यात येत असलेले कार्यालय अधीक्षक नि लेखापाल पदाचे वेतनश्रेणी हे रद्द करून त्यांना त्यांच्या मूळ पदाच्या वेतनश्रेणीवर आणण्याची कारवाई झाली. याबरोबरच परिवहनमधील बस क्यूशेडवरील जाहिराती आणि बसेसवरील अंतरबाह्य जाहिरातीच्या मक्त्यात घोळ करून त्यांना कोणतेही अधिकार नसताना त्या मक्त्याची मुदत या प्रकरणात स्वाक्षरी करून १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देऊन परिवहन उपक्रमाचे मोठे आर्थिक नुकसान केले.

या प्रकरणाची ही चौकशी होऊन त्यांचा खुलासा समाधानकारक आणि त्यांच्याविरुद्ध दोष सिद्ध झाल्याने त्यांच्यावर बडतर्फीची कारवाई करण्यात आली.



## नवले यांना कृतीनिष्ठ शिक्षक पुरस्कार

✔ **सुराज्य/माढा :** माढा तालुक्यातील केदारवस्ती उपळाई खुर्द येथे शिक्षिका पदावर कार्यरत असणाऱ्या श्रीमती प्रतिभा सुभाष नवले-मोगल यांना छत्रपती परिवार मरवडे यांच्यातर्फे देण्यात येणारा कृतीनिष्ठ शिक्षक पुरस्कार नुकताच हुतात्मा स्मृती मंदिर सोलापूर येथे संपादक अभय दिवाणजी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

अध्यक्षस्थानी शिक्षक समितीचे राज्य अध्यक्ष उदय शिंदे हे होते. या पुरस्कार वितरण कार्यक्रमासाठी माजी शिक्षण संचालक दिनकर पाटील, शिक्षण अधिकारी किरण लोहार माजी शिक्षणाधिकारी प्रदीप मोरे, जुनी पेन्शन संघटनेचे राज्याध्यक्ष वितेश खांडेकर हे उपस्थित होते. शिक्षक समितीचे राज्य संपर्कप्रमुख सुरेशजी पवार गुरुजी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. पुरस्काराबद्दल जिल्हाध्यक्ष राजन सावंत, केंद्रप्रमुख दिगंबर काळे जिल्हाध्यक्ष माननीय अनिल बापू कादे, गटशिक्षणाधिकारी बंडू शिंदे, मुख्याध्यापक, सर्व शिक्षकांनी तसेच पालक वर्गातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. स्पर्धात्मक युगात वाढत्या तंत्रज्ञानाच्या जगात संस्कारक्षम शिक्षण महत्वाचे असून या माध्यमातून बालवयात चांगले संस्कार करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरतो आहे. छत्रपती परिवाराच्या वतीने दिला गेलेला हा पुरस्कार जबाबदारी वाढवणारा असून आणखी चांगले काम करण्यास प्रोत्साहन देणारा असल्याचे नवले यांनी सांगितले.

# आजपासून सीना-कोळेगाव प्रकल्पाचे पाणी नेरलेसाठी सुरू

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

सिना कोळेगाव प्रकल्प प्रत्येक वर्षी शंभर टक्के भरतेच असे नाही. त्यामुळे या प्रकल्पावरती आधारित असलेली करमाळा बाजूकडील उपसा सिंचन योजना वर्षानुवर्षे बंद स्थितीमध्ये राहते. परंतु २०२० पासून धरण १०० टक्के भरल्यामुळे २०२० व २०२१ मध्ये कोळेगाव धरणाचे ओव्हर फ्लो पाणी नेरले व गौंडरे येथील तलावाला दिले होते. यावर्षीही म्हणजे २०२२ मध्ये कोळेगाव धरण ओव्हर फ्लो झाल्यामुळे या धरणातून नेरले तलावासाठी आजपासून पाणी सुरू करण्यात आल्याची माहिती आ. संजयमामा शिंदे यांनी दिली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन १ ऑक्टोबर रोजी गौंडरे चे माजी सरपंच सुभाष हनपुडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नेरले गावचे युवा नेते माजी उपसरपंच काकासाहेब पाटील, कोळेगाव प्रकल्पाचे उपविभागीय अधिकारी एस. जी. चौगुले, शाखा अभियंता डी. आर. कांबळे आदी उपस्थित होते.



सिना कोळेगाव प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना तालुक्याचे आ. संजयमामा शिंदे यांनी कोणत्याही परिस्थितीत योजना कार्यान्वित करा व वाहून जाणारे पाणी लाभ क्षेत्रातील गावांना द्या अशा सूचना दिल्या होत्या. तुम्हांला जिथे कुठे अडचण असेल तिथे मला किंवा माझ्या कार्यकर्त्यांना सांगा. तुमच्या अडचणी सोडवू परंतु माझ्या तालुक्यातील गावांना कोळेगाव प्रकल्पाचे पाणी मात्र प्राधान्याने मिळाले पाहिजे असे सूचित केले होते. त्यानुसार संबंधित विभागांनी वीज बिल भरणा करण्यापासून ते कॅनॉल दुरुस्ती , पंपांची दुरुस्ती, वीज पुरवठा करणाऱ्या वाहिन्यांची दुरुस्ती युद्धपातळीवरती पूर्ण करून कोळेगाव प्रकल्पाचे ओव्हर फ्लो पाणी २०२० पासून करमाळा तालुक्यातील नेरले तलावासाठी दिले जात आहे. नेरले तलावातील पाण्याचा लाभ नेरले या गावाबरोबरच सालसे , आळसुंदे व वरकुटे या गावातील शेतकऱ्यांनाही या पाण्याचा फायदा होत असतो. नेरले तलावावरती जवळपास १ हजार हेक्टर उसाची लागवड अवलंबून आहे.

# विजयादशमीनिमित्त पार्क स्टेडियम परिसरात जय्यत तयारी

## महापालिका व पोलीस आयुक्तांनी केली शमी वृक्ष परिसराची पाहाणी

✔ सुराज्य/सोलापूर

**विजयादशमीनिमित्ताने पार्क स्टेडियम लगतच्या शमी वृक्ष परिसराची महापालिका आयुक्त पी. शिवशंकर व पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी शनिवारी दुपारी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत तयारीची पाहणी करून आवश्यक कारवाईच्या सूचना दिल्या.**



या पाहणीच्या वेळी पोलीस उपायुक्त बापू बांगर, वैशाली कडूकर, उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, महापालिकेचे सहाय्यक आयुक्त विक्रम पाटील, नगर अभियंता संदीप कारंजे, पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांच्यासह महापालिका व पोलीस अधिकारी उपस्थित होते.

५ ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येणाऱ्या विजयादशमी दसऱ्यानिमित्ताने पार्क स्टेडियम लगत असलेल्या शमी वृक्षास प्रदक्षिणा घालून नवरात्रौत्सव मंडळ व भक्तगण भक्तिमय वातावरणात सीमोल्लंघन साजरे करतात. यानिमित्ताने मोठ्या प्रमाणात भक्तांची येथे गर्दी होत असते. यानिमित्ताने शनिवारी दुपारी महापालिका आयुक्त व पोलीस आयुक्तांनी पार्क स्टेडियमलगत असलेल्या शमी वृक्ष परिसरात केलेल्या आवश्यक सोयी सुविधा व इतर कामांची पाहणी केली.

### कोणत्याही अडथळयाविना सीमोल्लंघन होईल : शिवशंकर

सीमोल्लंघन दिवशी देवी भक्तांना धार्मिक विधी व्यवस्थित पार पाडण्याकरिता मदत व्हावी. कोणत्याही अडथळ्याशिवाय देवी भक्तांना सीमोल्लंघन विधी करता यावा यासाठी नियोजन करण्यात आले असून चार हुतात्मा पुतळ्याच्या बाजूच्या मुख्य द्वारातून भक्तगण प्रवेश करतील तर पार्क स्टेडियममधील मुळे पॅव्हेलियन समोरील द्वारातून बाहेर पडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. महापालिका प्रशासनाकडून नेटके नियोजन करण्यात आल्याची माहिती पालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली.



# ‘आदिनाथ’च्या संसारात नांदायच्या आधीच कुरघोड्या सुरु



**हर्षल बागल**

आदिनाथ सहकारी साखर कारखाना रोहित पवार चालवायला घेणार की निमगावचे संजय मामा शिंदे हे? असे प्रश्न उभा केले जात असतानाच अचानक सत्तेत आलेले मंत्री सावंत यांच्या मध्यस्थीने कारखाना चालू करण्याचा मुहूर्त ठरला. करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील व बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल कोलते या दोघांच्या देखरेखीखाली यंदाच्या गाळप हंगामात चालू करण्याचा नारळ फोडण्यात आला. हरिदास डांगे यांची एम. डी म्हणून नियुक्ती देखील करण्यात आली. कारखान्याची योग्य मार्गाने वाटचाल सुरू होण्याआधीच सर्वसाधारण वार्षिक सभेमध्ये काल परवा जे घडलं ते नवलच वाटण्यासारखे आहे. ‘आदिनाथ’च्या संसारात नांदायच्या आधीच कुरघोड्या सुरू. पाटील आणि बागल यांच्यात कुरघोड्या सुरू झाल्याचे दिसून आले.

आदिनाथची देणी कशी फेडायची? कारखान्याचे कर्ज कसे कमी करायचं? शेतकऱ्यांची थकित बिले कशी द्यायची? कामगारांच्या थकित पगारी कशा द्यायच्या? याच्यावरती चर्चा करायची सोडून नारायण पाटील यांनी रश्मी बागल विचारपीठावर असतानाच आमदारकीच्या विषयाला हात घातला. नारायण पाटलांचे बोलणं म्हणजे असं झालं, आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचा संसार चालू करायच्या आधीच कुरघोड्या चालू केल्यासारखे



आहे. आदिनाथ कारखान्याचे काय होईल? कसं होईल ? सभासदांचे कामगारांचे काय होईल? हे महत्त्वाचं नाही पण माझी आमदारकी मला मिळाली पाहिजे याचा हा केलेला अट्टाहास यातून दिसतो. आदिनाथ सहकारी साखर कारखान्यात लोणी तूप ज्यांनी ज्यांनी खायचा प्रयत्न केला, त्यांची राजकीय कारकीर्द संपुष्टात आली व रसातळाला गेली हा इतिहास आहे.

- आपण एकत्र कसे आलो मंत्री सावंत यांच्यासमोर बैठकीत काय ठरलं हे तुम्ही सांगितले नाही ते सभेत सांगा, असे नारायण पाटील म्हणताच कारखाना सुरू करण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत याशिवाय बाकीचा कोणताही विषय तेथे झालेला नाही, असे बागल यांनी सांगितले. विधानसभेला तुम्ही मला सहकार्य करणार आहात ना असे ठरले आहे ना, असे पाटील यांनी म्हटल्यावर रश्मी बागल यांनी विधानसभेचे काही ठरलेले नाही, असे सांगत हा विषय संपवला. मात्र वरील संवाद हा भर सभेतला असून यावरून एकच स्पष्ट होते, कारखाना चालवणे चालू करणे, हे महत्त्वाचे नसून आमदारकीचे पद महत्त्वाचं नेत्यांना दिसून येत आहे. पण गेल्या पाच सहा वर्षांमध्ये कारखान्याच्या सभासदांचा शेतकऱ्यांचा वाहन मालकांचा ऊस वाहतूकदारांचा एकाही संचालकाने या ठिकाणी आर्थिक बाबतीत विचार केलेला नाही. आदिनाथचा संसार थाटायच्या आधीच संसारात कुरघोड्या चालू झाल्याने आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचा संसार चालू होणार का ? चालू झाला तर तो किती दिवस टिकणार ? आणि टिकला तर शेतकरी सभासद यांची देणे, ऊस वाहतूकदारांची देणे, कामगारांच्या पगारी या मिळणार का? याकडे करमाळाच नव्हे तर जिल्ह्याचे लक्ष वेधलं आहे.

### आधी वाहन मालकांच्या – कामगारांच्या पैशाचं बघा

एन. सी. डी. सी बँकेतर्फे शरद पवार यांनी २०१४-१५ साली ११ टक्के व्याज दराने २५ कोटी कर्ज म्हणून आदिनाथला दिले होते. त्या रकमेचं काय झाले? महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव बँकेचे ५० ते ५२ कोटी रुपये कर्ज कारखान्यावरती आहे. संचालकांनी जवळच्या नातेवाईक असलेल्या वाहन मालकांना उचल म्हणून १४ कोटी दिले होते ते अद्याप वसुली नाही. वाहन मालकांच्या नावावर बँक ऑफ इंडियाचे १७ कोटी ३४ लाख रुपये कर्ज आहे. कर्मचाऱ्यांच्या नावावर आयसीआयसी बँकेतून चार कोटी पन्नास लाख रुपये कर्ज उपलब्ध केले होते, त्यातला अद्याप एक रुपया देखील परतफेड केलेली नाही. संबंधित वाहन मालकांच्या बँकेत त्यामुळे पत राहिलेली नाही. २०१४ ते २०२२ या कार्यकाळातील कर्मचाऱ्यांच्या ४८ कोटी रुपयांच्या पगारी कारखान्याकडून देणे आहेत. ज्या वाहनमालकांनी ऊस वाहतूक केली त्या वाहन मालकांचे अद्याप ९ कोटी ८० लाख रुपये देणे आहे. जरंडेश्वर कारखान्याकडून एक कोटी बत्तीस लाख रुपये येणे बाकी आहे तर हळगाव येथील कारखान्याकडून देखील ५० लाख रुपये येणे बाकी आहे. न्यायालयीन लढ्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या हक्काचे तीन ते सव्वातीन कोटी रुपये न्यायालयाच्या थकीत निर्णयामुळे अडकून पडले आहेत यावर एकही संचालक बोलायला तयार नाही.

# धैर्यशील मोहिते-पाटील यांची मांडणी, ठरणार भाजपसाठी निर्णायक बांधणी

**डी. एस. गायकवाड**

आठ आमदार आणि दोन खासदार भाजपसाठी फ्रंट लाईनला कार्य करीत असताना संघटनात्मक पातळीवर मजबूत संघटन शक्ती निर्माण करीत भाजपला सशक्त निर्माण केले आहे ते म्हणजे संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते पाटील यांनी.

संघटन सरचिटणीस पदावर कार्य करीत असताना आपल्या कुशल संघटनात्मक कौशल्यातून भाजप जोडो आंदोलन त्यांनी सुरू केले आणि पक्षाच्या ध्येय धोरणाला तळागाळात राबवून भाजपला मोठी उभारी प्राप्त करून दिली आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यासह जवळच्या फलटण, माण भागातील प्रत्येक गावातील कार्यकर्ता एकदिलाने भाजपसाठी कामाला लागलेला दिसत आहे. जिल्ह्यातील सर्वच भाजप ज्येष्ठ मंडळींच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी युवकांची एक मजबूत फळी उभी केली आहे. केंद्रीय स्तरावरील वेगवेगळी आरोग्य शिबिर वगैरे असे कार्यक्रम राबवून तळागाळातील घटकांना न्याय देत भाजपची ध्येयधोरणे त्यांनी प्रत्येकाच्या मनापर्यंत नेऊन ठेवली आहेत. बूथ रचना स्तरावर काम करून अनेक कार्यकर्त्यांना पदांचे कोंदण प्राप्त करून देत एक मजबूत संघटन त्यांनी उभे केलेले दिसते आहे.



त्यांनी लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणूक, पंढरपूर मंगळवेढा विधानसभा पोटनिवडणुकीत त्यांनी आपल्या कार्याचा करिष्मा दाखविला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारधारेने प्रभावित होऊन राज्य पातळीवरील भाजपच्या वरिष्ठ नेते मंडळींच्या नेतृत्वाखाली व जिल्ह्यातील ज्येष्ठ मंडळींच्या मार्गदर्शनाखाली ते सध्या भाजपची मोट बांधताना दिसत आहेत.

## शिंदे गटाच्या उत्तर तालुका प्रमुख निवडीचे घोंगडे भिजतच

**विष्णू सुरवसे**

शिवसेना ठाकरे गटाचा उत्तर तालुका प्रमुखाची निवड दसऱ्या मेळाव्याच्या अगोदरच करण्यात आली. आता शिंदे गटाच्या उत्तर तालुका प्रमुखाची निवड कधी होणार याची चर्चा होत आहे. जो कोणी दामाजी व सामाजिक पाठबळाचा वापर करेल त्याच्याच खांद्यावर उत्तर तालुका प्रमुखाची जबाबदारी सोपविण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. अद्याप तरी उत्तर तालुका प्रमुख निवडीच घोंगडे भिजतच असल्याचे दिसत आहे.

राज्यात शिंदे गटामुळे सत्ता बदल झाली, वाहत्या पाण्यात हाथ धुण्यासाठी अनेक शिवसैनिक माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांची सात सोडून शिंदे गटाची वाट पकडू लागले. उत्तर मधील काही शिवसैनिका नाराज होऊन, न्याय न मिळाल्याने हळू हळू शिंदे गटात सामील होत आहेत. उपजिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख मिळावे म्हणून वरिष्ठांकडे सेटिंग लावत आहेत. शिवसेनेचे माजी उत्तर तालुका प्रमुख शिवाजी नीळ, उत्तरचे माजी पंचायत समिती सदस्य सुधीर गोरे, वडाळा येथील नासिर शेख, होणसळ येथील राजू शिंदे यांनी उत्तर तालुका प्रमुखासाठी इच्छुक असल्याचे संपर्क प्रमुख, सहसंपर्क प्रमुख, जिल्हा व उपजिल्हा प्रमुख, शहर प्रमुख यांच्याकडे कळवले आहे. जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांनी शिवाजी नीळ यांची शिफारस केली आहे. उत्तर तालुका प्रमुख पदासाठी सामाजिक पाठबळ, संख्या बळ व आर्थिक बळाच्या जोरावर ज्यांचे शक्ती प्रदर्शन दिसून येईल त्यांचाच विचार करण्यात येणार असल्याचे सध्या तरी बोलण्यात येत आहे.

**सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाचे शहर असणाऱ्या बार्शीच्या मोठ्या नगरपालिका निवडणुकीसाठी सर्वच राजकीय नेते बाह्या सरसावून तयार झाले आहेत. सर्वांनीच अघोषित रणशिंग फुंकले आहे. भूमिगत मांडणी तर सुरू आहेच पण आता कोणतेही कोरोना विषयक नियम नसल्यामुळे मोठे मेळावे आणि सभांचीही जय्यत तयारी सुरू आहे.**

## निवडणुकांसाठी सर्वच नेते बाह्या सरसावून तयार

**सचिन अपसिंगकर**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांच्या जाहीर सभेचे आयोजन सुरू असल्याची चर्चा आहे. या सभेतच माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले आगामी पालिका निवडणुकीचा डंका पिटणार असल्याची कळते. बारबोले यांनी माजी मंत्री दिलीप सोपल यांच्या सोबत युती करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे बार्शीमध्ये महाविकास आघाडी होणार हे जवळपास निश्चित आहे. आमदार राजेंद्र राऊत हे सध्या सत्तेच्या जवळ आहेत. त्यांनी गेली अडीच वर्षे भाजप समर्थक आमदाराची भूमिका निभावली आहे. आता राज्यात भाजपच्या सहयोगाने आलेले सरकार ही त्यांच्या दृष्टीने जमेची बाजू आहे. त्यामुळे सरकार दरबारी सर्वस्व पणाला लावून तालुक्याची विकासकामे करवून घेण्यावर त्यांचा भर असेल.

सन २०१४-१५ साली कुमदा आर्यन कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे एफ. आर. पी. प्रमाणे थकबाकी देणेबाकी आहे. या कारखान्याचा तिढा वाढला आहे. नुकतेच हा कारखाना ताब्यात घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या बजरंग सोनवणे यांनी ही थकबाकी देण्याची तयारी दर्शवल्याचे सुतोवाच केले आहे. आता निवडणुका जवळ आले असल्यामुळे या प्रश्नाचे मोठे चरवण सुरू आहे. माजी मंत्री दिलीप सोपल यांनी या कारखान्याकडे असणारी थकबाकी देण्याची कोणतेही कायदेशीर व नैतिक उत्तर दायित्व आपल्यावर नसल्याची पुराव्यानिशी मांडले आहे. मात्र या प्रश्नावर सध्या तालुक्यातील राजकीय वातावरण पुन्हा ढवळून निघाले आहे.

### निवडणुका पक्षावर की आघाड्यावर?

आगामी नगरपालिका निवडणुकांमध्ये वैराग प्रमाणेच पक्षांमध्ये लढती रंगतात की स्थानिक आघाड्यांचे राजकारण जन्माला येते हे अगदी निवडणुकांचे उमेदवारी अर्ज भरण्याच्या मुदतीपर्यंत कोणाला कळून देण्याइतके बार्शीतील राजकीय नेते चतुर आहेत. निवडणुकीत मोठ्या खेळी होणार आहेत. मनगटशाही आणि धनशक्तीचे प्रदर्शन होणार आहे. त्यामुळे काही महिन्यावर आलेल्या निवडणुकीबाबत सर्वच घटकांना उत्सुकता आहे.

# कोणता झेंडा घेऊ हाती?



**अजित उंब्रजकर**

राज्यातील महाआघाडीची सत्ता पायउतार होऊन शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपचे सरकार आल्यानंतर राज्याच्या राजकारणात पक्षांतराचे मोठे पेव फुटले आहे. यामधून सोलापूर शहरही सुटू शकलेले नाही. सत्तांतरापूर्वी राष्ट्रवादीमध्ये जाण्यास इच्छुक असलेले अनेकजण आता सध्या वेट ॲन्ड वॉचच्या भूमिकेत आहेत. अशीच परिस्थिती आता महापालिकेच्या राजकारणातील लक्षवेधी नेते आनंद (दादा) चंदनशिवे यांची झाली आहे. आगामी महापालिका निवडणुकीत ते कोणत्या पक्षाचा झेंडा हातात घेणार याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागून राहिले आहे.

सोलापूर महापालिकेच्या राजकारणात आनंद चंदनशिवे एक महत्त्वाचे नेते मानले जातात. बहुजन समाज पार्टीच्या माध्यमातून २००७ मध्ये चंदनशिवे यांनी प्रथम महापालिकेत प्रवेश केला. पक्ष कोणताही असो, स्वत:च्या ताकदीवर महापालिकेत विजयी होणारे चंदनशिवे हे काही मोजक्या नेत्यामधील आहेत. सत्ताधारी, विरोधकांशी हातमिळवणी करून प्रभागातील विकासकामे करण्याचा त्यांचा हातखंडा आहे. याचा लाभ प्रत्येक निवडणुकीत त्यांना झाला. २०१७ च्या महापालिका निवडणुकीत त्यांच्या नगरसेवकांची संख्या दोनवरून चार झाली. लोकसभा निवडणुकीनंतर ते वंचित बहुजन आघाडीकडे वळले. त्यांनी वंचितकडून विधानसभा निवडणूक ही लढवली यामध्ये त्यांनी शहर उत्तर मधून २७ हजार पेक्षा जास्त मते मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मात्र त्यानंतर वंचित बरोबर त्यांचे काय बिनसले माहीत नाही, त्यांनी तत्कालीन पालकमंत्री दत्ता भरणे यांच्या सहकाऱ्याने राष्ट्रवादीचा रस्ता धरला. त्यांच्या माध्यमातून चंदनशिवे यांनी आपल्या प्रभागात कोट्यवधींची विकास कामे आणली. चंदनशिवे यांनी राष्ट्रवादी पक्षाकडे तब्बल आठ ते दहा जागांची मागणी केली होती. त्याला अनेक जणांचा विरोधही होता. मात्र या जागा आपल्याला हमखास मिळणार असे चंदनशिवे ठासून सांगत होते. मात्र जून महिन्यात राज्यातील महाआघाडीचे सत्ता गेली आणि शिंदे गट आणि भाजपचे सरकार आले. त्यामुळे चंदनशिवे यांचे नेते दत्ता भरणे यांचे पालकमंत्री पदही गेले. त्यामुळे चंदनशिवे यांचा राष्ट्रवादीमध्ये जाण्याचा निर्णय सध्यातरी पेंडिंग पडला आहे. मध्यंतरी चंदनशिवे यांना काँग्रेसचे नेते चेतन नरोटे यांनी पक्षात येण्याची ऑफर दिली होती. त्यांनी चंदनशिवे यांना १५ ते २० जागा देण्याचे कबूलही केले होते. मात्र चंदनशिवे यांनी त्यावर कोणतीही टिपणी केली नव्हती.

### निर्णयाकडे समर्थकांचे लागले लक्ष


महापालिका निवडणुका कधीही जाहीर होऊ शकतात. आता सध्यस्थितीत आनंद चंदनशिवे यांच्यासमोर राष्ट्रवादीमध्ये जायचे की, अन्य कोणत्या पक्षात जायचे की परत स्वगृही वंचितमध्ये परतायचे असे प्रश्न उभे आहेत. वंचित अथवा काँग्रेसमध्ये चंदनशिवे गेल्यास त्यांना शहर उत्तरमधून विधानसभेला उमेदवारी मिळवण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीमध्ये गेल्यास ती शक्यता फार कमी आहे. त्यामुळे चंदनशिवे काय निर्णय घेतात याकडे त्यांच्या समर्थकांचे लक्ष लागले आहे.




# खासदार दाखवा, बक्षीस मिळवा...

**संजय पाटील**

भारतातील लोकसभेच्या निवडणुका होऊन तीन वर्षे होऊन गेली. गत निवडणुकीत माढा लोकसभा निवडणुकीत मोठ्या अपेक्षेने विश्वास ठेवत भाजपचे रणजितसिंह निंबाळकर यांना निवडून दिले. या मतदारसंघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रखडलेल्या विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा होती मात्र जनतेला खासदार दाखवा बक्षीस मिळवा, असे म्हणण्याची वेळ आली आहे.



या मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते -पाटील यांनी नेतृत्व केल्यामुळे हा तसा चर्चेतला मतदारसंघ यामुळे हा मतदारसंघ ताब्यात घेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभा घेतली होती. जनतेनेही भाजपला कौल दिला. रणजितसिंह निंबाळकर यांना माळशिरस तालुक्यातून एक लाख ६३० मतांची आघाडी मिळाली होती.

पिलीव येथील अतिवृष्टी वेळी खासदार यांनी दादर पुलासाठी पाच लाख रुपये निधी जाहीर केला होता पण दोन वर्ष झाले तरीही निधी मिळालाच नाही. पिलीव येथील माजी सभापती संग्रामसिंह जहागीरदार व सरपंच नितीन मोहिते व झिंजेवस्तीचे सरपंच राहुल जावळे यांनी फलटण येथे जाऊन विकासकामांना निधी देण्याची मागणी केली होती पण कसलाच निधी मिळालाच नाही. खासदार रणजितसिंह निंबाळकर यांचा गेल्या तीन वर्षात किती निधी मिळाला याविषयी पिलीवचे सरपंच नितीन मोहिते, झिंजेवस्तीचे सरपंच राहुल जावळे, कुसमोडचे सरपंच तुषार लवटे, बचेरीचे सरपंच महादेव पाटील, सुळेवाडीचे सरपंच बापूराव करडे यांना विचारले असता खासदार फंडातून गेल्या तीन वर्षात एक रुपयाचाही निधी मिळाला नसल्याचे सांगितले. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकासकामांचा धडाका सुरु असताना माढा मतदारसंघाचे खासदार मात्र विकासकामांना निधी मिळवून देण्यात नापास झाल्याचे चित्र माळशिरस आहे.